

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक



https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.१६ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## पीएम नरेंद्र मोदी तिसऱ्या टर्ममध्ये आणखी एक ऐतिहासिक निर्णय घेणार

### लवकरच आणणार ‘वन नेशन, वन इलेक्शन’ विधेयक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ नवी दिल्ली**

केंद्रातील एनडीए सरकार त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळात ’वन नेशन, वन इलेक्शन’ विधेयक आणणार आहे. लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा एकत्रित करण्याच्या हेतूने वन नेशन, वन इलेक्शन नाव देण्यात आलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत समाविष्ट सर्व राजकीय पक्ष आणि सत्तेतील घटक पक्ष या विधेयकाचे समर्थन करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील १०० दिवस पूर्ण होण्याआधी हा रिपोर्ट समोर आला आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल ४ जूनला घोषित झाले. त्यानंतर ५ दिवसांनी ९ जूनला नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. एक देश, एक निवडणूक ही भाजपाच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यातील एक आश्वासन आहे. स्वातंत्रदिनी लाल किल्ल्यावर केलेल्या भाषणातही मोदींनी वन नेशन, वन इलेक्शन यावर भाष्य करत सर्व राजकीय पक्षांना एकत्र येण्याचं आवाहन केले होते.

**निवडणूक ३ किंवा ४ महिन्यात व्हायला हवी – पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले



होते की, एक देश, एक निवडणूक हा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवं जी काळाची गरज आहे. सरकारच्या ५ वर्षाच्या कारकिर्दीत निवडणुका व्हायला नकोत. निवडणूक ३ किंवा ४ महिन्यात व्हायला हव्यात. संपूर्ण ५ वर्ष राजकारण नको. त्यातून निवडणुकीसाठी लागणारा खर्चही मोठ्या प्रमाणात बचत होईल असं त्यांनी सांगितले.

तसेच आम्ही एक देश, एक निवडणूक यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापित केली. त्या समितीने रिपोर्ट सरकारला सोपवला आहे. आम्ही त्याचा अभ्यास करत आहोत. एक देश, एक निवडणूक यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, ही केवळ राजकीय घोषणा नाही. हे देशासाठी महत्त्वाचे आहे असंही मोदींनी म्हटलं होतं.

**रामनाथ कोविंद यांनी सोपवला रिपोर्ट**

दरम्यान, वन नेशन, वन इलेक्शन यावर अभ्यास करण्यासाठी बनवण्यात आलेली माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यांचा रिपोर्ट केंद्र सरकारला सोपवला. या रिपोर्टमध्ये काही शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यात पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि राज्यातील विधानसभा एकत्रित करायला हव्यात. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्यानंतर त्याच्या पुढील १०० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या पाहिजेत. त्यामुळे देशात एका ठराविक काळात सर्व निवडणुका पार पाडल्या जातील असं रिपोर्टमध्ये म्हटलं आहे.

## हिंदू समाज देशाचा कर्ता, काहीही घडलं तरी.. सरसंघचालक मोहन भागवतांचं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अलवर राजस्थान**

हिंदू असणं म्हणजे उदार असणे, प्रत्येकाला सद्भावना दाखवणे, मग त्यांची धार्मिक श्रद्धा, जात, आहार पद्धत काहीही असो, असे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केले. रविवारी राजस्थानातील अलवर या ठिकाणी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. हिंदू समाज हा देशाचा कर्ता आहे. त्यामुळे या देशात काहीही घडले तरी त्याचा परिणाम हिंदू समाजावर होतो आणि चांगले घडले तर हिंदूंचा अभिमान वाढतो, कारण हिंदू समाज हा देशाचा शिल्पकार आहे, असे मोहन भागवत म्हणाले.



आपण ज्याला हिंदू धर्म म्हणतो, तोच मुळात एक वैश्विक मानवधर्म आहे. हिंदूंना सर्वांचे कल्याण हवे असते. हिंदू असणे म्हणजे जगातील सर्वात उदार व्यक्ती असणे, जी व्यक्ती सर्वांना सामावून घेते, सर्वांसमोर सद्भावना दाखवते. हिंदूंना या मूल्यांचा वारसा त्यांच्या महान पूर्वजांकडून मिळालेला आहे. ते शिक्षणाचा वापर कोणालाही कमी दाखवण्यासाठी नाही तर ज्ञान वाटण्यासाठी करतात. तसेच संपत्तीचा वापर हा स्वत:साठी न करता परोपकारासाठी करतो. तसेच शक्तीचा वापर दुर्बलांचे रक्षण करण्यासाठी करतो, असेही मोहन भागवत यांनी सांगितले.

**संघाला बाहेरून विरोध करणारे अनेक लोक**

हिंदू धर्म, संस्कृती आणि समाजाचं रक्षण करणाऱ्याला हिंदू मानले जाते. तो कोणाची पूजा करतो, कुठली भाषा बोलतो, त्याची जात, प्रदेश किंवा आहाराच्या सवयी काय, याचा काहीही फरक पडत नाही. एकेकाळी लोक संघाला फारसे ओळखत नव्हते. पण आता त्याला व्यापक मान्यता प्राप्त झाली आहे. लोक आदराने याकडे बघतात. संघाला बाहेरून विरोध करणारे अनेक लोक आहेत. पण मनातून तेच लोक याचा आदर बाळगतात, असे मोहन भागवत यांनी म्हटले.

## अजित पवार गटाचे अर्ध्याहून अधिक आमदार हे शरद पवार गटात जातील

### आमदार बच्चू कडू यांचा मोठा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

आगामी काळात अजित पवार यांचे अर्ध्याहून आधिक आमदार हे शरद पवार गटात जातील, असा दावा प्रहारचे आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. तसेच लाडकी बहीण योजनेवरून सुरू असलेल्या श्रेयावादाच्या लढाईवरही त्यांनी भाष्य केलं आहे. बच्चू कडू यांनी आज अमरावतीत टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली.



आगामी काळात अजित पवार यांचे अर्धाहून आधिक आमदार हे शरद पवार गटात जातील. काही दिवसांनी अजित पवारदेखील तिकडे दिसू शकतात. त्यांना कुणीही अडवलेलं नाही. शेवटी हे राजकारण आहे. कधी कुणाच्या पारड्यात जाऊन बसायचं किंवा कुणाबरोबर राहायचं, हा ज्याचा त्याचा निर्णय आहे, असं बच्चू कडू म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी लाडकी बहीण योजनेवरून सुरू असलेल्या श्रेयावादाच्या लढाईवरही भाष्य केलं. राज्यात सध्या तीन पक्षांचे सरकार आहे. त्यामुळे श्रेयवादाची लढाई होणारच आहे. ते संयुक्तीक आहे. भाजपा म्हणतंय की लाडकी बहीण योजना आम्ही आणली, शिंदे गट म्हणतंय आम्ही आणली आणि अजित पवार यांचा पक्षही म्हणतोय की ती योजना आम्ही आणली. पण ही लाडकी बहीण योजना कुणी आणली, हे त्यानांच ठरवायचं आहे, अशी प्रतिक्रिया बच्चू कडू यांनी दिली.

**नितीन गडकरींच्या ‘त्या’ विधानावर केलं भाष्य**

यावेळी बोलताना त्यांनी नितीन गडकरी यांच्या विधानावरही प्रतिक्रिया दिली. विरोधकांनी आपल्याला पंतप्रधान पदाची ऑफर दिली होती, असं नितीन गडकरी म्हणाले होते. यासंदर्भात बोलताना, नितीन गडकरी यांच्या विधानाचा अर्थ काँग्रेसकडे पंतप्रधान पदासाठी माणसं नाही, असं होतो, असं ते म्हणाले.

## नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात राज्यात विधानसभा निवडणूक?; मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

आगामी विधानसभा निवडणुका या नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता असून २ टप्प्यात निवडणूक प्रक्रिया पार पडेल. मेरिट आणि विजयाची क्षमता असणाऱ्यांनाच उमेदवारी दिली जाईल हा महायुतीतील जागावाटपाचा फॉर्म्युला असेल असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. वर्षा बंगल्यावर पत्रकारांशी अनौपचारिक गप्पांमध्ये शिंदेंनी विधानसभा निवडणुकीवर भाष्य केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महायुतीतील जागावाटप येत्या ८ ते १० दिवसांत अंतिम होईल. अद्याप निवडणुकीच्या तारखांची घोषणा आयोगाने केली नाही. कदाचित नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात २ टप्प्यांमध्ये निवडणूक पार पडेल. विजयाची क्षमता आणि चांगला स्ट्राईक रेट यावरच तिन्ही पक्षांमध्ये जागावाटप होईल. आमच्या



महायुती सरकारला महिलांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. जवळपास १.६ कोटी महिलांना राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून अर्थसहाय्य मिळत असल्याचं त्यांनी सांगितले. तसेच लाडकी बहीण योजनेतून लाभार्थी महिलांना महिन्याला १५०० रुपये दिले जातात. आम्हाला २.५ कोटी महिलांपर्यंत हा लाभ पोहचवायचा आहे. आमचं सरकार हे सर्वसामान्यांसाठी आहे. महायुती सरकार राज्यात विकास आणि लोककल्याणकारी योजना यात समतोल साधत आहे. आमच्या सरकारचं मुंबईला झोपडपट्टीमुक्त बनवून सर्वांना परवडणाऱ्या किंमतीत घरे देण्याचं उद्दिष्ट आहे असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, महायुती असो वा महाविकास आघाडीत यांच्यात जागावाटप अद्याप निश्चित झालं नाही. माहितीनुसार, भाजपा आगामी विधानसभा निवडणुकीत १४०-१५० जागा लढवण्याची तयारी करत आहे तर शिंदेंच्या शिवसेनेने स्ट्राईक रेटचा हवाला देत १०० हून अधिक जागा मागितल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ६० हून अधिक जागा लढवणार असल्याचं म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीत चांगल्या कामगिरीनंतर महाविकास आघाडीने येत्या विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

## महायुतीत ७० टक्के जागांवर एकमत; जो जिथून जिंकेल तिथून लढेल : चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

महायुतीच्या तीनही नेत्यांनी जागा वाटपासाठी ८० किंवा ९० अशा कुठल्याही आकड्याचा आग्रह धरला नाही. जेथे अजित पवार जिंकतील तेथे त्यांचा आग्रह, जिथे शिंदे गटाचे आमदार जिंकतील तेथे त्यांचा आग्रह व जेथे भाजपचे उमेदवार जिंकतील तेथे आमचा आग्रह मान्य करू. आम्ही जिंकण्यासाठी लढण्याचा ‘फार्म्युला’ निश्चित केला असून आजवर ७० टक्के जागांवर एकमत झाले आहे, असे भाजपचे प्रदेश अध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.



बावनकुळे सोमवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, उद्धव ठाकरे यांना अडीच वर्षे सत्ता दिली. ते कधी मंत्रालयात गेले नाही. विधान भवनात गेले नाही. हे आता जुनी पेन्शन देऊ असे खोटे बोलत आहेत. आमचे सरकार सगळे प्रश्न सोडवत आहे. सोयाबीन बासमतीच्या शेतकऱ्यांना फायदा झाला. शेतकऱ्यांचा पीक आल्यावर मोठा फायदा झालेला लवकरच दिसेल. संजय गायकवाड यांचे समर्थन करत नाही. आरक्षण रद्द करू असे राहुल गांधी म्हणाले. नेहरू, राजीव गांधी आता राहुल गांधी, काँग्रेसच्या तीन पिढीच्या जे पोटात होते ते आज ओठात आले. एनडीए सरकार संविधान बदलणार असा प्रचार करण्यात आला. खरं तर काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला. खऱ्या आरक्षणाचे मारेकरी हे काँग्रेस आहे. जरांगे पाटील यांनी सुद्धा राहुल गांधी यांच्या वक्तव्यावर चर्चा केली पाहिजे, असेही बावनकुळे म्हणाले. देवेंद्र फडणवीस फक्त गणपती दर्शनासाठी अमिन पटेल यांच्या घरी गेले होते. यात नवीन आणि राजकारणासारखा काही नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## जयंत पाटलांच्या भेटीसाठी गोकुळला मीच पाठवलं; नरहरी झिरवाळांचा मोठा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६ मुंबई**

विधानसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली. अशात राज्याच्या राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला. राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी वाढल्या. अशातच विधानसभा उपाध्यक्ष आणि अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांचे चिरजीव गोकुळ झिरवाळ यांनी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं. दरम्यान, या भेटीवर आता नरहळी झिरवाळ यांनी प्रतिक्रिया दिली.

गोकूळ झिरवाळ यांनी गेल्या महिन्यात शरद पवार गटाच्या मेळाव्यास हजेरी लावली. यामुळे ते शरद पवार गटात जाणार असल्याची चर्चा सुरू झाली. दरम्यान, नरहरी झिरवाळ यांनी आज माध्यमांशी संवाद साधला.



यावेळी बोलतांना त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केलं. जयंत पाटील आणि गोकुळ झिरवाळ यांच्या भेटीविषयी विचारलं असता ते म्हणाले की, जयंत पाटील यांच्या भेटीसाठी गोकुळला मीच पाठवले होते. जयंत पाटील हा माझा नेता आहे. त्यांचा जाऊन सत्कार कर, अशा सूचना गोकुळला दिल्या होत्या, असं झिरवाळ म्हणाले.पुढं बोलताना ते म्हणाले की, गोकुळला मीच पाठवलं होतं. तिथे त्याला विचारले बापासारखे काही गुण आहेत का, म्हणून त्याने निवडणूक लढवण्याचे सागितलं होतं. त्यामुळं संभ्रम तयार झाला. पण आता तो जागेवर आहे आणि कायमस्वरूपी जागेवर राहणार आहे, असंही झिरवाळ यांनी स्पष्ट केलं.

## अजित पवारांनी घेतले फडणवीसांच्या घरी बाप्पांचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली. अजित पवारांनी मुंबईतील विविध गणेश मंडळांना भेट देत दर्शन घेतले. काँग्रेस आमदार अमीन पटेल हे देखील राष्ट्रवादीत प्रवेशाची चर्चा सुरु झाली आहे. अमीन पटेलांच्या राष्ट्रवादी प्रवेशाबाबत ’सागर’वर मंथन झाले. अमीन पटेल, अजित पवार, उपमुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीसांमध्ये २० मिनिटे चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या साक्षीने अमीन पटेल-अजितदादांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सुत्रांनी दिली

## शिंदेजी, संजय गायकवाडला आवरा, नाहीतर..., नाना पटोलेंचा मुख्यमंत्र्यांना इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबद्दल शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या विधानाने वादंग निर्माण झाले. आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या विधानावरून विरोधकांकडून महायुतीला लक्ष्य केले जात आहे. गायकवाडांच्या विधानावरून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना घेरले.

राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस देणार, असे विधान शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी केले. त्याबद्दल नाना पटोलेंनी संताप व्यक्त केला.

नाना पटोले म्हणाले, शिंदेजी, वाचाळवीर संजय गायकवाडला वेळीच आवरा... ज्याला लोकप्रतिनिधी म्हणून वागायची अक्कल नाही, त्याने राहुल गांधींवर बोलूच नये.




अंथरूण बघून पाय पसरावे म्हणतात ना, तसे गायकवाडने आधी आपली पातळी पाहावी. प्रसिद्धीसाठी बरळणाऱ्या संजय गायकवाडवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. या सरकारची गुंडशाही, हुकूमशाही, तालिबानशाही जनता पाहत आहे.

**कायदा-सुव्यवस्था आहे की नाही? शिंदे-फडणवीसांना सवाल**

नाना पटोले पुढे म्हणाले, आणि आता एकनाथ शिंदे यांच्या पक्षातला गुंड प्रवृत्तीचा आमदार देशाच्या विरोधी पक्षनेत्याची जीभ कापून टाकण्याची भाषा करतो. यावर एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडलीच पाहिजे. या राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे की नाही? लोकशाही मानता की नाही?, असा सवाल पटोले यांनी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना केला.

## संपादकीय ......

# राजकीय पक्षांना कार्यालयाचे राजकारण

संसद भवनात कार्यालय असावे, अशी प्रत्येक राजकीय पक्षाची इच्छा असते. राजकीय पक्षांचे सदस्य निवडणुका जिंकून संसदेत पोहोचतात. त्यानंतर राजकीय पक्ष संसद भवनात स्वत:साठी कार्यालय शोधू लागतात. आता कार्यालय देताना मोठ्या पक्षांचाच विचार केला जातो; पण छोट्या पक्षांना कार्यालय देताना त्या पक्षांकडून किती राजकीय फायदा होतो, याचा विचार लोकसभा अध्यक्ष करताना दिसतात.

राजकीय पक्ष कार्यकर्त्यांना संसद भवनाच्या कार्यालयात भेटायला बोलावून परिसरात संदेश देण्याचेही काम करतात. त्यांना या संदेशाचा राजकीय फायदाही होतो. संख्याबळाचा विचार करता मोठ्या राजकीय पक्षांना पक्ष कार्यालयासाठी खोली वाटपात कोणतीही अडचण येत नाही; पण संख्यात्मकदृष्ट्या छोट्या राजकीय पक्षांना कार्यालयीन खोल्यांचे वाटप होण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यांना पूर्णपणे लोकसभा अध्यक्षांवर अवलंबून राहावे लागते. लोकसभा अध्यक्षांची इच्छा असेल, तरच अशा पक्षांना खोली मिळू शकते. नवीन संसद भवन बांधूनही बहुतेक राजकीय पक्षांना जुन्या संसद भवनात एक खोली मिळावी, अशी इच्छा आहे, ज्याला आता संविधान भवन म्हणून ओळखले जाते. ज्या राजकीय पक्षांच्या खासदारांची संख्या २० पेक्षा जास्त आहे, त्यांनाच संविधान सदनाच्या तळमजल्यावर खोली मिळू शकते. २० पेक्षा कमी खासदार असलेल्या राजकीय पक्षांना या इमारतीच्या तिसर्या मजल्यावर खोल्या देण्यात आल्या आहेत.

संसद भवनातील खोल्यांची संख्या निश्चित आहे, त्यामध्ये राजकीय पक्षांना खोलीचे वाटप करावे लागते. लोकसभा सचिवालयासाठी ही मोठी डोकेदुखी आहे. स्वातंत्र्यानंतर संसद भवनात काही मोजके राजकीय पक्ष असताना खोली उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण नव्हती; पण जसजसा काळ वाढत गेला, तसतशी राजकीय पक्षांची संख्या वाढत गेली. अशा स्थितीत खोल्यांचे प्रश्न निर्माण होऊ लागले. ही परिस्थिती पाहता खोल्या वाटपासाठी काही मानके तयार करण्यात आली. ही मानके त्यांच्या सदस्यांच्या संख्येच्या प्रमाणात ठरविली; पण यासाठी कोणताही औपचारिक नियम किंवा कायदा नाही. पण, लोकसभा सचिवालयाने एक मानक तयार केला आहे. यानुसार, किमान ८ खासदार असलेल्या राजकीय पक्षांना खोल्या दिल्या जातील. असे असले तरी हे लिखित मानक नाही. लोकसभा अध्यक्षांची इच्छा असल्यास ते कमी संख्या असलेल्या राजकीय पक्षांना खोल्या वाटण्याची परवानगी देऊ शकतात. लोकसभा अध्यक्षांनी काही वेळा असे केले आहे. याची उदाहरणे १७ व्या लोकसभेत पाहायला मिळाली. यामध्ये अकाली दल, लोक जनशक्ती पक्ष या पक्षांना त्यांची संख्या कमी असतानाही कार्यालयीन खोल्या देण्यात आल्या.

कौल आणि शकधर यांनी लिहिलेले पुस्तक संसदेची कार्यपद्धती चालवण्यासाठी आधारभूत मानले जाते. यानुसार पाचव्या लोकसभेपर्यंत काँग्रेस पक्ष सत्तेत राहिला. या पक्षासाठी संसद भवनात कार्यालयासाठी सर्व सोयींनीयुक्त दोन खोल्या होत्या (ज्याला आता संविधान सदन म्हणतात), तर विरोधी पक्षाकडे सेंट्रल हॉलच्या लॉबीमध्ये सुसज्ज खोली आणि काही विश्रामगृहे होती; पण सहाव्या लोकसभेत जनता पक्ष २९५ जागांसह सत्तेत आला. या लोकसभेत काँग्रेसचे १५४ खासदार होते. याशिवाय मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे २२, एआयडीएमकेचे १८, अकाली दलाचे ९, कम्युनिस्ट पक्षाचे ७, शेतकरी आणि कामगार पक्षाचे ५, रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टीचे ४, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकचे ३, केरळ काँग्रेस, इंडियन युनियन मुस्लिम लीग, जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स आणि द्रमुकचे प्रत्येकी २ खासदार, झारखंड आणि महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाचे प्रत्येकी एक खासदार होते. याशिवाय ९ अपक्ष खासदार होते. सहाव्या लोकसभेत राजकीय पक्षांच्या कार्यालयांसाठी चार सुसज्ज खोल्यांची व्यवस्था केली होती. यामध्ये एक सत्ताधारी पक्ष जनता पक्षासाठी, तर एक प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेस पक्षासाठी होती. एक खोली मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला आणि एक खोली अण्णाद्रमुक पक्षाला दिली. सातव्या लोकसभेत काँग्रेस पुन्हा सत्तेत आल्यावर त्यांना संसद भवनातील पक्ष कार्यालयात ४ खोल्या दिल्या. उर्वरित पक्षांना त्यांच्या संख्येनुसार प्रत्येकी एक-एक खोल्या दिल्या. त्यावेळी संख्याबळ ठरविण्याचे प्रमाण ८ सदस्य ठेवले होते. हे ८ सदस्य दोन्ही सभागृहांतील किंवा एकाच सभागृहातील असू शकतात; पण खोल्या वाटपासाठी किमान ८ खासदार असणे आवश्यक होते. आठव्या लोकसभेपासून सतराव्या लोकसभेपर्यंत ही परंपरा कायम होती. सध्याच्या अठराव्या लोकसभेतही त्याच परंपरेनुसार पक्ष कार्यालयासाठी खोल्या दिल्या जात आहेत.



# दूग्ध व्यवसायाची जोड दिल्यास तेथील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळेल

**– ॲड. निलेश हेलोंडे-पाटील**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती–** राहुरी कृषि विद्यापीठातील चारा व गवत पिके प्रकल्पातील विविध पिकांवर झालेल्या संशोधनाचा विदर्भ व मराठवाड्यातील पडीक जमिनीवर अवलंब केल्यास तेथील शेतकऱ्यांना वर्षभर हिरवा चारा उपलब्ध होऊ शकेल. त्याला दूग्ध व्यवसायाची जोड दिल्यास तेथील शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळेल. या संशोधनाच्या अवलंबनातून विदर्भ व मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देता येईल. या विद्यापीठात होत असलेले संशोधन विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन अमरावती येथील कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे-पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारा पिके संशोधन प्रकल्पास व गवत संशोधन प्रकल्पास ड. हेलोंडे-पाटील यांनी आज भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख तथा वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. विजू आमोलिक, चारा पैदासकार डॉ. लक्ष्मण तागड, चारा पिके प्रकल्पाचे कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. संदीप लांडगे, अहमदनगरचे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुनील तुंबारे, अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक अतुल बुटे व राहुरीचे कृषि अधिकारी अशोक गिरगुणे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी ॲड. श्री. हेलोंडे-पाटील यांनी प्रक्षेत्र भेटी दरम्यान प्रत्येक चारा व गवत पिकांची माहिती घेतली. चारा पिकांमध्ये मका, चवळी, लसून घास आणि गवत पिकांमध्ये नेपियरचे विविध वाण, स्टायलो, दशरथ घास, मारवेल, पवना गवत, डोंगरी गवत, मद्रास अंजन आदी चारा पिकांचा समावेश होता. या सर्व चारा व गवत पिकांचा विदर्भ व मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यात प्रसार कसा करता येईल, याविषयी त्यांनी शास्त्रज्ञांशी चर्चा केली. काटे विरहित निवडुंग, त्याचे पौष्टिक मूल्य तसेच आहारातील समावेश याची माहिती श्री. हेलोंडे-पाटील यांनी जाणून घेतल्यानंतर विदर्भ तसेच मराठवाड्यातील पडीक जमिनीवर लागवड करण्याचा मनोदय व्यक्त केला. यानंतर त्यांनी अखिल भारतीय समन्वित संगमनेरी शेळी संशोधन प्रकल्पास भेट दिली. याप्रसंगी प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे यांनी संगमनेरी क्षेत्रीय युनिट विषयी तसेच प्रकल्पावर उभारलेल्या गोट गॅलरीद्वारे शेळ्यांचे आहार व्यवस्थापन तसेच शेळ्यांचे वर्षभर चाऱ्याचे नियोजन, जंतांमुळे होणारे आजार व शेळीपालन प्रकल्प अहवालाविषयी विस्तृत माहिती दिली.या चारा पिके प्रकल्प तसेच गवत संशोधन योजना येथील भेटीच्या नियोजनासाठी या प्रकल्पातील अजित हरिश्चंद्र, कनिष्ठ संशोधन सहाय्यक दीपक पालवे, कृषि सहाय्यक संदीप ढगे, नवनाथ धामोरे, सुहास भालेराव, श्रीमती शैला दरवडे, श्रीमती मंगला आंधळे, अशोक शेटे, संजय बोरुडे, समर्थ दुबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हळद पिकातील कंदमाशी, करपा व कंदकुजचे कसे कराल व्यवस्थापन

**विदर्भ प्रजासत्ताक**

सध्याच्या वातावरणामध्ये हळदीवर कंदमाशी या किडीचा आणि पानावरील ठिपके, करपा व कंदकुज सारख्या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे तरी शेतकऱ्यांनी खालील प्रमाणे व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात.

## उपाययोजना

कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक १५ दिवसांच्या अंतराने क्विनॉलफॉस २५%- ४०० मिली (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट ३०%- ३०० मि.ली. (१५ मिली प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका कीटकनाशकाची प्रति एकर या प्रमाणे झाडावर आलटून पालटून फवारणी करावी व सोबत चांगल्या दर्जाचे स्टिकर मिसळावे.

उघडे पडेलेल्या कंदाजवळ कंदमाशीची मादी अंडी घालते त्यामुळे उघडे पडलेले कंद मातीने वेळोवेळी झाकून घ्यावेत. वेळेवर हळदीची भरणी करावी.

जमिनीतून क्लोरपायरीफॉस ५०%- १००० मिली (५० मिलि प्रति १० लिटर पाण्यात) घेऊन प्रति एकरी या प्रमाणात आळवणी करावी. याच पद्धतीने कीटकनाशकाची आळवणी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एक महिन्याच्या अंतराने प्रत्येक महिन्यात निश्चित करावी.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

पानावरील ठिपके आणि करपा व्यवस्थापनासाठी करपाजन्य रोगग्रस्त पाने वेळोवेळी जमा करून जाळून नष्ट करावीत आणि शेतात स्वच्छता राखावी.

## रासायनिक व्यवस्थापन

१) प्रादुर्भाव कमी असल्यास कार्बेंडेझीम ५०% – ४०० ग्रॅम (२० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा मॅन्कोझेब ७५% – ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५०% – ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी.



हळद 'कंदकुज' साठी उपाय

### २) प्रादुर्भाव जास्त असल्यास

एजोक्सिस्ट्रोबीन १८.२% + डायफेनोकोनॅझोल ११.४% (पूर्वमिश्रित बुरशीनाशक) – २०० मिली (१० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा प्रोपीकोनॅझोल २५% – २०० मिली (१० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा क्लोरथॅलोनील ७५% – ५०० ग्रॅम (२५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकर याप्रमाणे सोबत स्टिकर मिसळून फवारणी करावी.

हळदीमधील कंदकुज व्यवस्थापनासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एकरी २ ते २.५ किलो ट्रायकोडर्मा शेणखतामध्ये मिसळून जमिनीतून द्यावे.

जास्त पावसामुळे शेतात साठलेल्या अतिरिक्त पाण्याचा वेळोवेळी निचरा करावा. जेणेकरून कंदकुज होण्यास कारणीभूत असलेल्या बुरशीचा प्रसार कमी करता येईल.

कंदकूज झाली असल्यास जमिनीतून कार्बेंडेझीम ५०% – २०० ग्रॅम (१० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा मॅन्कोझेब ७५% – ६०० ग्रॅम (३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड ५०% – १००० ग्रॅम (५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात) यापैकी एका बुरशीनाशकाची प्रति एकरी या प्रमाणात दरवेळी महिन्यातून एकदा आळवणी करावी.

आळवणी करताना जमिनीमध्ये वापसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकास पाण्याचा थोडा ताण द्यावा.

### फवारणी करताना घ्यावयाची विशेष काळजी

– कुठलीही फवारणी करताना पावसाचा अंदाज घेऊनच फवारणी करावी

– वरील कीटकनाशका सोबत कुठल्याही प्रकारचे इतर कीटकनाशके, बुरशीनाशके, विद्राव्य खते,सूक्ष्म मूलद्रव्ये अथवा रसायने मिसळू नये.

– लागोपाठ एकच एक कीटकनाशक फवारू नये.

– फवारणी करिता दुषित पाणी न वापरता स्वच्छ पाणी वापरावे आणि पाण्याचे प्रमाण शिफारसितच वापरावे, कमी पाणी वापरल्यास फवारणीचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाही.

– किडनाशके फवारणी करताना योग्य ती संरक्षक विषयी काळजी घ्यावी.

संदर्भ

हळद संशोधन केंद्र, कसबे डिग्रज जि. सांगली

अधिक माहितीसाठी संपर्क

कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

०२४५२-२२९०००




# तुम्ही पण सलग अर्धा तास मोबाईल वापरताय?

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

दैनंदिन जीवनामध्ये मोबाईलची गरज अत्यावश्यक असली तरी याचे धोकेही जास्त आहेत. मोबाईलवरून माहितीचा खजिना मिळत असल्याने हॅंडसेट जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. तथापि, नव्या संशोधनातून मोबाईलच्या अतिवापरामुळे हार्टअटॅकचा धोका असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. कॅनडातील प्रख्यात हृदयरोग तज्ज्ञ एल्सेव्हिएर यांच्या शोधनिबंधामध्ये हा दावा करण्यात आला आहे.

**३० मिनिटे–** सलग अर्ध्या तासाहून (३० मिनिटे) अधिक मोबाईलचा वापर केल्यास हृदयविकाराचा त्रास होण्याची दाट शक्यता असल्याचे एका संशोधनातून पुढे आले आहे.

**५ मिनिटे ते २९ मिनिटे–** पाच मिनिटांपासून ते २९ मिनिटांपर्यंत मोबाईलचा वापर केल्यास हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता तीन टक्क्यांनी संभवते, असे या संशोधनात नमूद केले आहे.

**४,४४,०२७–** ४,४४,०२७ ब्रिटनमधील ४ लाख ४४ हजार २७ जणांची चाचणी घेऊन हा संशोधन अहवाल तयार करण्यात आला होता. मोबाईलच्या वापराआधी यातील एकालाही रक्तदाबाचा त्रास नव्हता.

**१२.३ वर्षे पाहणी**चाचणी केलेल्या लोकांपैकी बहुतेकजणांना १२.३ वर्षांत हृदयविकाराचा त्रास सुरू झाला होता. यापैकी अनेक जणांचा हार्टअटॅकने मृत्यूही झाल्याचे सरकारी डाटातून स्पष्ट झाले आहे.

**मधुमेह, धूम्रपान घातक** : नियमित मोबाईलचा वापर करणाऱ्यांनाही हृदयविकाराचा धोका संभवतो. मधुमेह



अथवा धूम्रपान करीत असणाऱ्या हृदयविकाराचा धक्का बसण्याची शक्यता अधिक असते.मानसिक तणाव, कमी झोप : कमी झोप, मानसिक तणाव, मनोविकाराची समस्या असणाऱ्यांनाही मोबाईलच्या अतिवापराने हार्टअटॅकचा धोका जाणवत असल्याचे या संशोधनात म्हटले आहे. नियमित मोबाईल वापरणाऱ्यांना मोबाईल न वापणाऱ्यांच्या तुलनेत हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता सर्वाधिक आहे.

**अचूक उपायांची गरज** : मोबाईलचा कसा आणि किती वेळ वापर करायचा याबाबत अचूक उपाययोजना शोधण्याची गरज आहे. अशी सूचनाही या संशोधनात केली आहे.

# बाधित पिकांसाठी १३ कोटी रु उपलब्ध

## सन २०२२ मधील सततच्या पावसाचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती** –सन २०२२ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले होते. यासाठी एनडीआरएफच्या निकषाने शासनाने ११६.५७ कोटींचा निधी यापूर्वी उपलब्ध केला होता. यानंतर ४८ हजार शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त निधीची मागणी जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे केली होती. त्यानुसार १३.२० कोटींचा निधी शासनाने उपलब्ध केला आहे.सन २०२२ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसाने खरीप हंगाम बाधित झाला. या बाधित पिकांसाठी निकषाचे बाहेर जाऊन शासन मदत देण्याचे जाहीर करण्यात आले होते. यासाठी कृषी व महसूल विभागाच्या यंत्रणांनी पंचनामे केले होते. यामध्ये १,८९,३५८ शेतकऱ्यांच्या १,१९,१८२ हेक्टरमधील पिकांचे ३३ टक्क्यांवर नुकसान झाल्याने जिल्हाधिकारी यांनी १२९.५७कोटींच्या निधीची मागणी केली होती. तो निधी आता उपलब्ध झाला आहे. या शेतकऱ्यांच्या याद्या तयार असल्याने शेतकऱ्यांना व्हीके नंबर प्राप्त होताच ई-केवायसी करावी लागेल. त्यानंतर हा शासन मदत निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.–



RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# गणेश विसर्जनादरम्यान पोलिसांचा राहणार तगडा बंदोबस्त

## भक्तांच्या सुरक्षेसाठी १ हजार ८०० पोलीस तैनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

गणपती विसर्जनाच्या आनुषंगाने शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये ३ पोलीस उपायुक्त, ४ सहायक पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ७० सहायक पोलीस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, १ हजार ३०० पोलीस अधिकारी, आरसीपी, क्यूआरटी पथक, १ एसआरपीएफ कंपनीसह ५५० जवानांचा समावेश आहे. तसेच महिला होमगार्ड, अशा एकूण १ हजार ८०० हून अधिक पोलीस बंदोबस्त तैनात राहणार आहेत. शहरात शनिवारी ७ ते १७ सप्टेंबर दरम्यान गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत



आहे तसेच १६ सप्टेंबर रोजी ईद–ए– मिलाद सण साजरा होत आहे. त्यामुळे शहरातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबादीत राखण्या साठी, १४ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी छत्रीतलाव येथील गणेशमूर्ती विसर्जनस्थळाची तसेच फरशी स्टॉपपासून छत्री तलावविसर्जन मार्गाची पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. तसेच बॅरिकेड्स, लाइटिंग योजना, आपत्कालीन टॉर्च, सीसीटीव्ही कॅमेरे, उंचीवरून विसर्जनस्थळावर लक्ष ठेवण्यासाठी मचान. छत्री तलावालगत कृत्रिम तलाव तयार करणे,मिरवणूक मार्गावरील झाडांच्या फांद्यांची वर्गवारी करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, जलतरणपटू तैनात करणे आदी कामांबाबत महापालिका, महामंडळ, स्वच्छता विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग, विद्युत विभाग आणि पोलीस अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. आयुक्तालय क्षेत्रातील पोलीस ठाणे

निहाय शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे, संमिश्र व संवेदनशील वस्ती या ठिकाणी फिक्स पॉइंट बसविण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सुरक्षेसाठी १२ सीआर मोबाईल व्हॅन, ७ दामिनी पथक, बीट मार्शल आणि डायल ११२ वाहने शहरात सतत गस्तीवर राहणार आहेत. शहरातील चौका चौकात पोलिसांची करडी नजर राहणार आहे.तसेच सायबर सेल पोलिसांचे विशेष पथक सोशल मीडियावरही लक्ष राहणार आहे. मिरवणूक मार्ग आणि विसर्जनाच्या ठिकाणांवर सीसीटीव्ही कॅमेरे आणि व्हिडिओग्राफरच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, शस्त्रे, लाठ्या, आक्षेपार्ह गाणी वाजवणे, आक्षेपार्ह झांकी दाखवण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

# मेळघाटच्या चिखलदऱ्यांमधील जामली गावात खा.अनिल बोंडे यांनी दिली भेट

## उपचाराधीण रुग्णांची केली चौकशी मृत नागरिकांच्या घरी दिली सांत्वनपर भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६चिखलदरा :**

चिखलदरा तालुक्यातील जांमली गावात गेल्या आठवड्यापासून सात रोगाचे थैमान पसरले आहे. या ठिकाणी आज राज्यसभा सदस्य अनिल बोंडे यांनी भेट देत उपचाराधीन असलेल्या रुग्णांची चौकशी केली व त्यांना पूर्ण क्षमतेने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना आरोग्य विभागाला दिल्या.जामली यार गावात सात रोगाचे थैमान वाढल्याने जलजन्य व किटकजन्य आजारांमुळे काही रुग्णांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. एकूण दहा रुग्णांपैकी सहा रुग्णांचा मृत्यू हा वृद्ध काळाने झाला होता तर जणांचा मृत्यू हा अतिसाराची लागण झाल्यामुळे झाल्याचे पुढे आलं होत. त्यानंतर तातडीने राज्यसभा सदस्य डॉ.अनिल बोंडे यांनी जांमली आर गावात धडक देत जिल्हा परिषद शाळेत आरोग्य विभागाने उभारलेल्या अस्थाई रुग्णालयाला भेट दिली. या ठिकाणी सध्या सहा रुग्ण उपचाराधीन आहेत. डेंग्यूने बाधित असलेल्या सहा रुग्णांना आरोग्य विभागाने पूर्ण क्षमतेने व चांगले वैद्यकीय उपचार द्यावे, अशा सूचना त्यांनी चिखलदऱ्याचे तालुका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. चंदन पिंपळकर व धारणीच्या डॉ.तिलोत्तमा वानखडे यांना



### मृतक कुटुंबीयांप्रती व्यक्त केल्या सांत्वना

जामली गावात वृद्धापकाळाने ६ नागरिकांचा मृत्यू देखील झाल्याचे समोर आलं होतं. त्यांच्या घरी डॉ.अनिल बोंडे यांनी भेट देत त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधला. तसेच मृतक कुटुंबीयांच्या दु:खात भाजप पूर्णपणे सहभागी असून सर्वतोपरी मदत शासनाकडून मिळवून देण्यासाठी तत्पर असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केलं.–

### जल जीवन मिशनची कामे निकृष्ठ दर्जाची

जामली गावात जल जीवन मिशन मार्फत पाईपलाईन अंथरण्याचे काम करण्यात आले आहे. सदर पाईपलाईनचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने अनिल बोंडे यांनी संताप व्यक्त केला. तसेच निकृष्ट पाईपलाईनच्या कामांची चौकशी करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागाला दिले. पाईपलाईन लिकेज झाल्याने गावात दूषित पाण्याचा पुरवठा झाला व त्यातूनच जलजन्य आजारांची नागरिकांना लागण झाल्याचा प्राथमिक अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे.

दिल्या. तसेच उपचार घेत असलेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची त्यांनी आस्थेने विचारपूस केली. यावेळी मेळघाटचे माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, केवलराम काळे, भाजपचे जिल्हा कोषाध्यक्ष मोहन जाजोदिया, भाजपा तालुकाध्यक्ष गजानन खडके, माजी तालुकाध्यक्ष दिनेश चव्हाण, सरपंच सुशीला भूसूम, गंगाराम गायन, मुन्ना उमरकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार म्हणजे ज्ञानपिपासू व्यक्तिमत्व-डॉ.पंकज चांदे

## जयंतीनिमित्त विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्र येथे व्याख्यान संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार म्हणजे ज्ञानपिपासू व्यक्तिमत्व होतं, त्यांच्या ज्ञानाच्या क्षेत्राला कुठल्याही मर्यादा नाहीत, असे ते ज्ञानी होते, असे प्रतिपादन कविकुलगुरू कालिदास विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंकज चांदे यांनी केले. ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या जयंतीनिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती संशोधन केंद्राच्याच्यावतीने 'डॉ. श्रीकांत जिचकार : एक आगळं व्यक्तिमत्व' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्राचे संचालक डॉ. संदीप जोशी उपस्थित होते.

डॉ. चांदे पुढे म्हणाले, सर्वाधिक पदवी प्राप्त करणारा व्यक्ती म्हणून डॉ. श्रीकांत जिचकार हे जगातील एकमेव असे व्यक्तिमत्व आहे. ज्योतिष्यशास्त्रात ते एवढे निपूण होते, की स्वत:च्या आयुष्याबाबतही त्यांना अवगत होते. त्यांनी केलेली भाकिते अगदी तंतोतंत खरी ठरली आहेत.

दिल्ली येथे भरलेल्या पुस्तक प्रदर्शनीमधील उदाहरण सांगतांना डॉ. चांदे म्हणाले, डॉ. श्रीकांत जिचकार यांनी पुस्तक प्रदर्शनीतून दिडशे पुस्तके विकत घेतली व सर्वच्या सर्व त्यांनी वाचलीत. आफ्रिके मधील डरबन येथे झालेल्या जागतिक धार्मिक परिषदेतही त्यांनी भाषण दिले होते. एकूणच सगळ्याच क्षेत्रात ते ज्ञानवंत होते, असेही डॉ. चांदे



### परिसासारखं डॉ. श्रीकांत जिचक यांचं व्यक्तिमत्व – कुलगुरू

डॉ. मिलींद बारहाते अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, परिसाला स्पर्श झाला की, त्याचे जसे सोने होते, तसे डॉ. श्रीकांत जिचकार यांचं व्यक्तिमत्व होतं. त्यांच्या जो कोणी संपर्कात आला, त्यांचे भविष्य उज्वल झाले. अतिशय कठीण विषय ते अगदी सोप्या भाषेत उपस्थितांना सांगायचे. त्यांची विधानसभा, संसदेमधील भाषणे आपण संकलित करुन त्याचे पुस्तकरुपाने प्रकाशन करू असा विझासही यावेळी कुलगुरू डॉ. बारहाते यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर स्मृति संशोधन केंद्राच्या विकासासाठी जे जे करता येईल ते करू असेही ते म्हणाले.

### डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यामुळेच मी घडलो–डॉ. सुनिल देशमुख

प्रमुख अतिथी डॉ. सुनिल देशमुख म्हणाले, डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यामुळेच मी घडलो. डॉ. श्रीकांत जिचकार यांनी नऊ विषयात एम.ए. केले होते व सर्वच विषयामध्ये ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेत. जगातील सर्व विषयाचं ज्ञान त्यांना होतं. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती कायम स्मरणात रहाव्यात, यादृष्टीने त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ संशोधन केंद्राच्या उभारणीसाठी प्रयत्न केलेत व त्यात अखेर यश आले. आशियातील सर्वाधिक उच्चशिक्षित व्यक्ती म्हणून त्यांचा वल्र्ड रेकॉर्ड आहे, असे डॉ. देशमुख म्हणाले.

म्हणाले. ज्ञान मिळविल्यानंतर त्याचा डॉ. श्रीकांत जिचकार यांनी खरं बोलणे, कर्तव्य आणि ज्ञानदान असे उपयोग करा, असा सल्ला त्यांनी दिला. दयानंद सरस्वती हे त्यांचे गुरु होते व डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या निधनानंतर दयानंद सरस्वती यांनी डॉ. श्रीकांत जिचकार पुन्हा येतील, असे भाष्य केले होते. असेही डॉ. चांदे यांनी यावेळी सांगितले.

# शासनाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील चुकीच्या धोरणाविरोधात २५सप्टेंबरला राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती–** शासनाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील चुकीच्या धोरणाविरोधात राज्यातील शिक्षक संघटनांनी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय सर्व प्राथमिक शिक्षक संघटनांच्या बैठकीत शनिवारी (१४ सप्टेंबर) घेण्यात आला आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळा, विद्यार्थी, शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांच्या सोडवणुकीकडे दुर्लक्ष केले आहे. दुसरीकडे १५ मार्च संचमान्यता व २० अथवा २० पेक्षा कमी पटसंख्येच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील एक शिक्षक पद बंद करून कंत्राटी पद्धतीने सेवा निवृत्त शिक्षक नियुक्त करण्याचा निर्णय (५ सप्टेंबर २०२४) घेतला आहे. या दोन्ही निर्णयाच्या परिणामी विद्यार्थ्यांचे शिक्षणच बंद होण्याची स्थिती आहे. बालकांना दर्जेदार शिक्षणापासून दूर लोटण्याच्या निर्णयास सर्व क्षेत्रातून विरोध होणे गरजेचे आहे. विद्यार्थी शाळेत दाखल आहे मात्र काही विद्यार्थ्यांचे जन्मतारखेचे प्रमाणपत्र नसल्याने आधार कार्ड निघत नाही. मात्र या वास्तवाकडे दुर्लक्ष करून आधारकार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षक संच निर्धारणासाठी व योजनांच्या लाभासाठी ग्राह्य न धरण्याची शासनाची भूमिका अचंबित करणारी आहे. मंगळवार दि. १७ सप्टेंबर पासून शिक्षकांनी काळी फीत लावून विरोध प्रदर्शन करणे. बुधवार दि. १८ सप्टेंबर पासून थर्हीी–ीि च्या कथीत प्रशासनिक गृपमधून बाहेर पडून असहकार सुरू करणे. दि. २५ सप्टेंबर रोजी सर्व शिक्षकानी रजेवर जात प्रत्येक जिल्ह्यात मोर्चा काढणे अशाप्रकारे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शासनाकडे नोटीस पाठविण्यात येणार आहे. प्राथमिक शिक्षक संघटना निर्धार बैठकीचे अध्यक्षस्थानी शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील) राज्याध्यक्ष केशवराव जाधव होते. मार्गदर्शक म्हणून शिक्षक नेते संभाजीराव थोरात, उदयराव शिंदे होते. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी



प्रास्ताविक केले. पुरोगामी शिक्षक समितीचे प्रसाद पाटील, शिक्षक परिषदेचे राजेश सुर्वे,आदर्श शिक्षक समितीचे शिवाजीराव साखरे, आखिल भारतीय शिक्षक संघाचे किरण पाटील, शिक्षक सेनेचे चिंतामणी वेखंडे, शिक्षक भारतीचे नवनाथ गेंड, पदवीधर शिक्षक संघटनेचे अनिल पलांडे, मनोज मराठे, पंजाबराव देशमुख संघटनेचे प्रभाकर झोड, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे सतिश कांबळे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे यादव पवार, शिक्षक सहकार संघटनेचे निलेश देशमुख, ऊर्दू शिक्षक संघटनेचे साजीद अहमद, जुनी पेन्शन हक्क संघटनेचे तुषार पाटील व शहाजी गोरवे, एम एड् कृती समितीचे राजू सावकार जाधव, इब्टा शिक्षक संघटनेचे उतरेश्वर मोहलकर, महाराष्ट्र शिक्षक समन्वय महासंघ मधुकर काठोळे, एकल शिक्षक सेवा मंचचे विकास खांडेकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राजन कोरगांवकर, राजन सावंत, पल्लवी गायकवाड, प्रकाश घोळवे, अंकुश काळे, पवन सुर्यवंशी, एस के पाटील, संजय नाईक, संजय जाधव, तुषार पाटील, शशिकांत पोवार आदी सर्व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बाप्पाच्या निरोपासाठी इंको फ्रेन्डली विसर्जनावर भर

## शहरात मनपाचे ३५ ठिकाणी कृत्रिम टॅंक

**दि.१६ अमरावती** शहरात १७ सप्टेंबरला अनंत चर्तुथींच्या दिवशी गणपती बाप्पांना निरोप देण्यात असल्याने त्या दिवशीसाठी पोलिसांप्रमाणे मनपा विभागा देखील सज्ज झाला. विसर्जनाच्या दिवशी मनपाने बाप्पाला निरोप देण्यासाठी इंको फ्रेल्डली विसर्जनावर म्हणजे मातीच्या मुर्तीचे विसजर्नावर भर दिला असून त्यासाठी छत्री तलाव परिसरात युध्दपातळीवर तयारी देखील केली आहे. छत्री तलावसह शहरातील ३५ प्रमुख ठिकणी मनपाने कुत्रिम टॅंक तयार केले आहे. तर छत्री तलाव परिसरात विसर्जनासाठी २० पेक्षा जास्त मिनि पाईन्ट तयार करण्याचे काम अंतिम टप्प्याती आहे. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आज अधिकारी, कर्मचाऱ्यांसह या संपूर्ण कामांचा आढावा घेतला.

छत्री तलाव येथे गणेश विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात नागरीक येत असतात. त्यामुळे मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी आज सहाय्यक आयुक्त दिप्ती गायकवाड, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदिप पाटबागे, उपअभियंता नितीनबोबडे, अभियंताशरदतिनखेडे, जेष्ठस्वास्थनिरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी सोबत छत्री तलाव परिसरातील विसर्जनाच्या कामाची पाहणी करून आवश्यक सुचना देखील दिल्या. विसर्जन मार्गाची दैनंदिन साफ सफाई व आरोग्य विषयक दैनंदिन फवारणी करावी, विसर्जनठिकाणीनिर्माल्याकरीता स्वतंत्र व्यवस्थापन करावे, विसर्जन स्थळी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करणे, विसर्जन स्थळी प्राथमिक आरोग्य पथक अँम्बुलंन्स सह सज्ज ठेवणे तसेच विसर्जन स्थळी आवश्यक ठिकाणी पाण्यावरील गाळ व कचरा काढणे, आर्टीफिशीयल टॅंक ठेवणे अश सुचना मनपा आयुक्तांनी दिल्या. पशुवैद्यकीय विभागामार्फत गणेशोत्सव विसर्जनाच्या काळात रस्त्यावरील व विसर्जन परिसरात मोकाट जनावरांची पकडण्याची व्यवस्था करावी.उद्यान विभागामार्फत विसर्जनाच्या मार्गावरील झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम पुर्ण करावे तसेच विसर्जनासाठी निर्मित केलेल्या खड्डयाचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याचे निर्देशमनपा आयुक्तांनी यावेळीदिले. अग्निशमन विभागाला विसर्जन स्थळी अग्निशमन पथक सज्ज ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. मनपा आयुक्तांनी विसर्जनाच्या स्थळी प्रकाश व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. तसेच जनरेटर लावण्याचे निर्देश दिले.

### या ३५ ठिकाणी राहणार कृत्रिम टॅंक

मनपाने गणपत विसर्जनासाठी अभियंता भवन, शेगाव नाका, सहकार नगर, ग्राऊंड, फार्मसीशासकीयविद्यालय, कठोरानाका, आराधनाबिल्डींग रिंगरोड, चाणक्य हॉटेल, नागपुर रोड, शिवाजी कमर्शियल मार्केट, रविनगर चौक, नेहरु मैदान, प्रशांत नगर बगिचा, मालटेकडी जवळ, प्रथमेश तलाव वडाळी, छत्रीतलाव, विद्यापीठ चौक, पुलाजवळ, मोती नगर, बगीचा, साईनगर, साईमंदीर जवळ, बडनेरा, झिरी तलाव, गोपाल नगर, जीम जवळ, बडनेरा, बारीपुरा, रवी नगर, महाजनपुरा हनुमान नगर, बुधवारा याठिकाणी नागरीकांना आर्टीफिशीयल टॅंकची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. नागरीकांनी आपल्या घरातील श्री. गणेश विसर्जन नेमून दिलेल्या जवळच्या आर्टीफिशीयल टॅंकमध्येच विसर्जन करावे. जेणेकरुन पर्यावरणाचा समतोल साधणेस व स्वच्छता मोहीमेस नागरीकांचा हातभार लागेल असे आवाहन मनपा आयुक्त सचिन कलंत्रेनी केले आहे.



### छत्री तलाव परिसर साफ, अनेक ठिकाणी मिनी पाईन्ट तयार

# काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी कुणाल चौधरी यांचे उपस्थितीत शहर काँग्रेसची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**




## शहर काँग्रेस पूर्ण क्षमतेने निवडणुकीला सज्ज

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव महाराष्ट्राचे प्रभारी कुणाल चौधरी यांचे प्रमुख उपस्थितीत अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची येणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक आढावा बैठक काँग्रेस भवन सभागृहात उत्साहात संपन्न झाली. यानंतर अमरावती विधानसभा व बडनेरा विधानसभे इच्छुक उमेदवारांचे प्रत्यक्ष मत सुद्धा प्रभारी यांनी जाणून घेतले.या वेळी मंचावर खासदार बळवंत वानखडे, माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर,माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख , शहर काँग्रेस अध्यक्ष बबलू शेखावत माजी आमदार वीरेंद्र जगताप, माजी महापौर विलास इंगोले माजी महापौर मिलिंद चीमोटे,अशोकराव डोंगरे,किशोर बोरकर,भैया पवार, बाळासाहेब भुयार, जयश्रीताई वानखडे, हाजी नजीर खान, नसीम खान, निलेश गुहे,वैभव देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

येणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा व संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व महाराष्ट्राचे प्रभारी कुणाल जी चौधरी यांचा महाराष्ट्र दौऱ्यातील आज अमरावती अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या संघटनेचा आढावा घेण्यात आला. येणारा निवडणुकांना सामोरे जात असताना महाराष्ट्रतील जनतेसोबत दगाबाजी करून असंवैधानिक पद्धतीने सत्तेवर आलेल्या या भाजप प्रणित महायुती सरकारला धडा शिकवण्या करिता काँग्रेस कार्यकर्त्यांनी आता सज्ज झाले पाहिजे त्याचप्रमाणे या महायुती सरकारने राज्यात भ्रष्टाचारी कारभार सुरू आहे याची पोलखोल खऱ्या अर्थाने जनतेमध्ये जाऊन करण्याची वेळ आलेली आहे. या राज्यातील शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक, माता-भगिनींची सुरक्षा या सर्वच मुद्द्यांवर हे सरकार सपशेल अपयशी ठरलेले आहे. राज्यातील जनता यांना नाकारणार तर आहेच परंतु आता जनतेला निरनिराळी अमिष दाखवून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु महाराष्ट्रातील जनता या धोकेबाज सरकारच्या प्रत्येक कृतीकडे बारकाईने लक्ष ठेवून असून या मतपेटीतून धडा शिकवणार असल्याचे प्रतिपादन यावेळी कुणाल चौधरी यांनी केले. यावेळी अमरावती शहरातील संघटनात्मक बाबींचा ग्रामीण व शहराध्यक्ष यांनी संपूर्ण आढावा सादर केला त्याचप्रमाणे एकजुटीने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता जोमाने कार्य करणार असल्याची ग्वाही दिली.यावेळी अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २२ सप्टेंबरला दिवस अन् रात्र समान; गोलार्ध पृथ्वीपासून समान अंतरावर राहणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

नेहमीच दिवस व रात्र यांचा कालावधी असमान असतो. मात्र २२ सप्टेंबरला हा कालावधी प्रत्येकी १२ तासांचा राहील. या दिवशी दोन्ही गोलार्ध पृथ्वीपासून समान अंतरावर राहणार असल्याचे खगोल तज्ज्ञांनी सांगितले. पृथ्वीवर दर वर्षाला २१ मार्च व २२ सप्टेंबर या दिवशी दिवस व रात्र प्रत्येकी १२ तासांचे म्हणजेच समान असतात. या विशेष तारखांना खगोल शास्त्रात विषुवदिन म्हणतात. इतर वेळी दिवस व रात्र नेहमीच लहान-मोठे असतात. दिवस व रात्रीची असमानता ही पृथ्वीच्या आसाच्या कलन्यामुळे निर्माण होते. पृथ्वीचा अक्ष हा २३.६ अंशाने कललेला आहे. जो गोलार्ध सूर्याकडे कलतो, त्या गोलार्धात दिवस १२ तासापेक्षा मोठा व रात्र १२ तासापेक्षा लहान असते. जेव्हा कोणताही गोलार्ध सूर्याकडे कललेला



नसतो, तेव्हा पृथ्वीवर दिवस व रात्र समान असतात. पृथ्वीच्या परांचल गतीमुळे या दिवसात थोडाफार फरक पडू शकत असल्याचे खगोल अभ्यासकांनी सांगितले. खगोलप्रेमींनी व भूगोलाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी २२ सप्टेंबर या दिवशी दिवस व रात्रीचे प्रत्यक्ष काल मापन करावे व दिवसाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मराठी विज्ञान परिषद, अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौसी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी केले आहे. प्रकाशवृत्त उत्तर, दक्षिण ध्रुवातून जाणार या दोन्ही दिवशी दोन्ही गोलार्ध पृथ्वीपासून समसमान अंतरावर असतात व प्रकाश वृत्त उत्तर, दक्षिण ध्रुवातून जाते. म्हणून २१ मार्च व २२ सप्टेंबरला दिवस व रात्र समसमान असतात. आकाशात वैषुविक व आयनिक वृत्तांचे दोन काल्पनिक छेदनबिंदू आहेत. त्यापैकी एकातून २१ मार्च रोजी सूर्य प्रवेश करतो त्याला वसंत संपात बिंदू म्हणतात तर त्याच्या विरुद्ध बिंदूत २२ सप्टेंबरला सूर्य प्रवेश करतो, त्याला शरद संपात बिंदू म्हणतात.

# नागपूर जिल्ह्यात कायनाइट- सिलीमनाइट खनिजाचे साठे

## चंद्रपूर, यवतमाळमध्ये चूनखडक : राज्य भूवैज्ञानीय कार्यक्रम मंडळाची बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ नागपूर –** भूविज्ञान व खनिकर्म समन्वेषाच्या १२ भूवैज्ञानीय संचालनालयाद्वारे खनिज सर्वेक्षण व योजनांमुळे नागपूर जिल्ह्यात कायनाइट-सिलीमनाइट या खनिजांचे साठे शोधण्यात आले असून, नागपूर शहर, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात चूनखडक तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात बॉक्साइट खनिजांची विपुल प्रमाणात साठे उपलब्ध असल्याचा शोध घेण्यात आला आहे. परमाणू खनिज संचालनालयातर्फे गोंदिया व छत्तीसगड सीमा क्षेत्रात बिजली रायोलाईट या भूस्तरामध्ये युरेनियम खनिजांची पूर्वेक्षण योजना प्रस्तावित आहे.

राज्य भूवैज्ञानीय कार्यक्रम मंडळाची ६० वी बैठक अतिरिक्त मुख्य सचिव (खनिकर्म) इकबाल सिंह चहल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये २०२३-२४ मध्ये संचालनालयातर्फे राबविण्यात आलेल्या योजना, तसेच २०२४-२५ मध्ये प्रस्तावित असलेल्या खनिज



सर्वेक्षणाच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला, यावेळी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाच्या संचालक अंजली नगरकर, भारतीय भूवैज्ञानीय सर्वेक्षण विभागाचे संचालक नवजित सिंग नैय्यर, एमइसीएलचे प्रदीप कुळकर्णी, माईलचे शुभम अंजनकर, जवाहरलाल नेहरू ॲल्युमिनिअम रिसर्च डेव्हलपमेंट अँड डिझाईन सेंटरचे मुख्य वैज्ञानिक प्रवीण गुप्ते, महाराष्ट्र राज्य सुदूर संवेदन उपाययोजना केंद्राचे अजय देशपांडे, वेकोलीचे ओम दत्त, महासंचालक टी.आर. के. राव, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचे श्रीराम कडू, एस. पी. आवळे, उपसंचालक रोशन मेश्राम उपस्थित होते

# चिखलदऱ्यातील कुख्यात दुचाकी चोरट्यास घाटात अटक

## एलसीबीची धडाकेबाज कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती–** गस्तीवर असलेल्या स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने चिखलदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात एक सराईत चोर चोरीच्या दुचाकीसाठी ग्राहक शोधत असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांची शिताफीने डमी ग्राहक पाठवून दुचाकी चोरट्यास अटक केली. भारत मक्कु धोत्रे (२६)रा.सलोना, ता. चिखलदरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे हे त्यांच्या पथकातील एपीआय सचिन पवार, कॉस्टेबल युवराज मानमोठे, रवींद्र वऱ्हाडे, स्वप्निल तंवर, सागर नाठे,शांताराम सोनोने, शिवा सिरसाठ यांच्यासह १५ सप्टेंबर रोजी प अचलपुर डिव्हीजनमध्ये गस्तीवर के होते. सलोनाच्या घाटात लोकांना चोरीची दुचाकी विक्री करण्याचा प्रयत्न करित असल्याची गोपनीय माहिती एलसीबीच्या पथकाला मिळाली. सलोना घाटात झाडाझडती घेतली असता त्यांना भारत मक्कु धोत्रे हा एमएच-२७- बीएस-६९५८ क्रमांकाची हिरो कंपनीची पॅशन प्रो दुचाकी विक्री करित होता. त्यानुसार पोलिसांनी एक डमी ग्राहक भारतजवळपाठविला. तो पर्यंत पोलिसांनी दुचाकी क्रमांक ट्रेस केला असता ती दुचाकी अचलपुर कृऊबास परिसरातून चोरी झाली असून अचलपुर पोलिस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे समजले.

# ई-पीक पाहणीत नाव नाही, नका घेऊ टेन्शन; मिळणार शासन मदत; कपाशी सोयाबीन ला अनुदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**




ई-पीक पाहणी केलेल्याशेतकर्यांना गतवर्षीच्या कपाशी व सोयाबीनसाठी दोन हेक्टर मर्यादेत हेक्टरी पाच हजारांची मदत दिली जाणार आहे. यामध्ये अनेक शेतकर्यांची नावे या यादीत नसल्याने त्यांनाही योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासनाने आता पर्याय सुचविला आहे. यामध्ये ज्या शेतकर्यांच्या सात-बार्यावर या पिकांची नोंद आहे त्यांनादेखील शासन मदत मिळणार आहे.गतवर्षीच्या खरीप हंगामात पावसाअभावी कपाशी व सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले व सरासरी उत्पादनात कमी आलेली आहे. शिवाय हमीभावही शेतकर्यांना मिळाला नसल्याने उत्पादन खर्चही निघालेला नाहीः त्यामुळे या खातेदारांना दोन हेक्टर मर्यादित प्रति हेक्टरी पाच हजारांची मदत देण्याचा निर्णयशासनाने घेतला. यामध्ये ज्या खातेदारांनी ई पीक पाहणी केली असेल त्यांनाच मदत देण्यात येणार असल्याचे शासनादेशात नमूद करण्यात आले. याबाबत जमाबंदी विभागाने ई पीक पाहणी केलेल्या खातेदारांच्या याद्या कृषी विभागाला पाठविल्या. यामध्ये जिल्ह्यातील ४२गावांच्या याद्याच नव्हत्या. याशिवाय तलाठीस्तरावर ई-पीक पाहणी केलेल्या काही खातेदारांची नावे गहाळ असल्याने शेतकरी संतप्त झाले होते. त्यानुसार आता ज्या सात-बार्यावर कपाशी-सोयाबीनची नोंद आहे. अशा शेतकर्यांना शासन अर्थसहाय्य मिळण्याची शक्यता आहे.

### वनपट्टेधारकांची यादी जिल्हाधिकारी देणार

आदिवासी शेतकर्यांना वनपट्टे वितरित करण्यात आलेले आहे. अशा वनपट्टेधारकांपैकी कपाशी किवा सोयाबीन अथवा दोन्ही पिकांची लागवड केली होगी, याची गावनिहाय यादी संकलित करण्यात येऊन जिल्हास्तरावरुन ही यादी कृषी विभागाला देण्यात येणार आहे व याची पोर्टलवर माहिती कृषी विभागाद्वारा अपलोड करण्यात येणार आहे.

### तलाठी देणार कृषी सहायकांना यादी

गतवर्षीच्या कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना मदत देण्याची गुरुवारी शासनाने कार्यपद्धत विषद केली आहे. त्यानुसार गावनिहाय ई पीक पाहणीवरून संबंधित तलाठी यांनी गाव नमुना १२ वरुन ई-पीक पाहणी यादीत नाव नसलेल्या परंतु सात-बारावर कपाशी व सोयाबीन पिकांची नोंद आहे. अशा शेतकर्यांची यादी विहित नमुन्यात तयार करून कृषी सहायकांना देणार आहे.

# उधारीच्या पैशावरून दोन गटात हाणामारी

## फायर झाल्याची चर्चा, आरोपीविरुध्द गुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

उधारीच्या पैशावरून चांदणी चौक संकुलात दोन गटात सशस्त्र संघर्ष झाला, यात एकाने तरुणाच्या डोक्यात लोखंडी पाईपने वार केल्याने त्याची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या वादात देशी बनावटीच्या पिस्टलने गोळीबार झाल्याची चर्चा आहे. नागपुरी गेट पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. रविवारी दुपारी चार वाजता ही घटना घडली. अब्दुल तालिब अब्दुल जहीर (वय २६, कमला ग्राउंड) असे जखमीचे नाव आहे.

चांदणी चौकातील रहिवासी शेख समीर यांचे अब्दुल



तालिबकडे काही अवैध व्यावसायिक व्यवहाराचे पैसे होते. रविवारी दुपारी चार वाजता अब्दुल तालिब हा पैसे मागण्यासाठी त्यांच्या १० ते १५ समर्थकांसह चांदणी चौकात पोहोचला तेव्हा दोघांमध्ये वाद झाला. यावेळी शेख समीरचा भाऊ मोनू त्याच्या समर्थकांसह तेथे पोहोचला. काही वेळातच दोन गटात हाणामारी झाली. ज्यामध्ये एकाने अब्दुल तालिबच्या डोक्यावर लोखंडी पाईपने वार केले. तसेच दुसऱ्या गटातील तरुणाने खिशातून देशी पिस्तूल काढून हवेत दोन राऊंड फायर केल्याचे बोलले जात आहे. गोळीबारासारखा आवाजही संकुलातील लोकांनी ऐकल्याची चर्चा आहे. या संघर्षात दोन्ही बाजूनी दगडफेकही करण्यात आली. त्यामुळे कॅम्पसमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेबाबत पोलिसांना माहिती मिळताच एसीपी अरुण पाटील, नागपुरीगेटचे ठाणेदार हनुमंत उरलागोंडावार पथकासह घटनास्थळी पोहोचले. तसेच जखमी तालिबता रुग्णालयात पाठवले. तर अन्य जखमी शेख मोनूला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून दोन्ही गटातील युवकांची चौकशी सुरू आहे.

# कुख्यात मामूविरूध्द एमपीडीए या वर्षातील सातवा एमपीडीए



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती:–** खून, दरोड्यासह सात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या कुख्यात गुन्हेगार अभिषेक उर्फ मामु रमेश डिक्याव (२३, रा. मेहरबाबा कॉलनी, जेवड नगर, अमरावती) याच्याविरूध्द एमपीडीएअन्वये कारवाई करण्यात आली. त्यानुसार त्याला १४ सप्टेंबर रोजी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात एक वर्षासाठी स्थानबध्द करण्यात आले.अभिषेक उर्फ मामु हा सन २०१९ पासून गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये लिप्त आहे. त्याचेविरूध्द राजापेठ, फ्रेजरपुरा ठाण्यात खून, जबरी चोरी, दरोडा, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवून दंगा करणे, अग्निशस्त्र बाळगणे, अधिसुचनांचे उलघंन करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकूण सात गुन्हे दाखल आहे. त्याच्यावर यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले होते. तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय असल्याने त्याच्याविरूध्द एमपीडीए करण्याबाबतचा प्रस्ताव राजापेठ पोलिसांनी पोलीस आयुक्तांकडे पाठविला होता. त्या प्रस्तावाची गुन्हे शाखेच्या पोलीस निरिक्षक सिमा दाताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एमपीडीए सेलमधील सहायक पोलीस निरिक्षकइम्रान नायकवडे, पोलीस अंमलदार विनय गुप्ता, अजय मिश्रा, चेतन कराडे यांनी पुर्तता केली. त्या प्रस्तावावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी १४ सप्टेंबर रोजी आदेश पारीत केले. राजापेठचे ठाणेदार महेंद्र आंभोरे यांनी तो आदेश तामिल करून त्यास स्थानबध्दतेच्या कालावधीकरीता मध्यवर्ती कारागृहात दाखल केले.

# राहुल गांधींच्या आरक्षणाच्या वक्तव्याचा भाजपाकडून जाणीवपूर्वक प्रचार,मात्र आरक्षण विरोधी भाजपाच- किशोर बोरकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती–** आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटवून सर्व समाज घटकांना आरक्षणाचा लाभ मिळावा अशी जाहीर भूमिका देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यापूर्वीच घेतल्यामुळे भाजपाचे नेते हैराण झाले असुन अमिरीकेतील एका कार्यक्रमातील खासदार राहुल गांधी यांच्या आरक्षणाबाबत अर्धवट टिप्पणी जनतेला भाजपा नेते आंदोलन करून सांगत आहेत, भाजपाच्या नेत्यांची दोगली भुमिका व आरक्षणाचा खरा विरोधक भाजपा असल्याचा देशातील जनतेला चांगल्याप्रकारे ठावुक असल्याचे टिका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केली असुन ते पुढे म्हणाले की,आज जाती,जातीत



व अल्पसंख्याक , मागासवर्गीय व इतर समाज घटकांमध्ये दहशतीचे भीतीचे वातावरण भाजपाने निर्माण केले आहे.खोटे बोलण्यात व खोटे आश्वासन देण्यात भाजपाचे नेते पटाईत असुन मागील वेळेस सरकार सत्तेवर आल्यास पहील्याच कॅबिनेट मध्ये धनगर समाज बांधवांना आरक्षणाचा निर्णय करण्यात येईल.असे जाहीर आश्वासन देवेंद फडणवीस यांनी दिल्या मुळे भाजपाचे सरकार सत्तेत आले होते. आज या घोषणेला १० वर्षे होत आहेत, धनगर समाज बांधवांचे पंढरपूर येथे व राज्यात इतर ठिकाणी आक्रमक आंदोलन सुरू असुन धनगर समाजाचे युवक आत्महत्या करीत आहेत .

आज राज्यात व केंद्रात भाजपाचे सरकार असल्यामुळे हिंमत असेल, तर धनगर समाज बांधवांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आरक्षण देवुन ओबीसी व मराठा समाजाला सुध्दा आरक्षणाचा निर्णय करावा,मग तेव्हा कुठे राहुल गांधी यांचेवर आरोप करावा.असे खरमरीत खडे बोल किशोर बोरकर यांनी भाजपला केले आहेत.देशातील बेरोजगारांना २ कोटी नौकऱ्या देण्याची पंतप्रधान मोदींनी केलेल्या घोषणेचे काय झाले,किती बेरोजगारांना नौकऱ्या भाजपाच्या सरकारने दिल्या,असा सवाल किशोर बोरकरांनी केला असुन ते पुढे म्हणाले की, देशातील उद्योगपतिंचे २० हजार कोटींचे कर्जे मोदीजींनी माफ केले मात्र शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही. भाजपा सरकार कंत्राटी पद्धतीने नौकर भरती करीत असल्यामुळे संविधानाने दिलेले आरक्षणच गडप करण्यात येत असुन आरक्षणाचे खरे विरोधक भाजपा असल्याचा असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी केला आहे.

# मेंढपाळांच्या सर्व अडचणी दूर केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही - आ. बच्चू कडू

## मेंढपाळ बांधवांच्या मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अचलपूर**

मेंढपाळ बांधवांच्या पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेळ्या व मेंढ्यांची मरत होते ही झालेली मरतूक याला शासनाकडून नुकसान भरपाई अनुदान मिळण्यात यावे तथा मेंढपाळ बांधवांच्या मेंढ्यांचे व शेळ्यांचे शासनाकडून एक रुपयात विमा योजना ही पुन्हा सुरू करण्यात यावी

सध्या शेळ्यांमध्ये व मेंढ्यांमध्ये असलेला आजार निमोनिया घटसर्प व सीसीपीपी या रोगामुळे मोठ्या प्रमाणात पशुंचे नुकसान होत आहे त्याकरिता शासनाकडून मागील चार वर्षापासून मागणी असलेला पुरवठा करण्यात यावा हा प्रश्न शासन दरबारी मांडण्यात येणार असल्याचे मत आमदार बच्चू कडू यांनी अचलपूर येथील मेंढपाळ बांधवांच्या मेळाव्यात बोलतांना व्यक्त केले.

भटक्या जमाती व मेंढपाळ धनगर समाजासाठी राज्य सरकार मार्फत विविध योजना राबविल्या जातात .परंतु या संदर्भात योग्य माहिती नसल्यामुळे खरे व गरजू लाभार्थी योजनांपासून वंचित राहतात ,ही बाब लक्षात घेता अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बच्चू कडू यांनी भटक्या तसेच मेंढपाळ धनगरांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचा संकल्प केला आहे. त्या अनुषंगाने या योजनांची माहिती देण्यासाठी तसेच लाभार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत रविवारी १५ सप्टेंबर रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मील कॉलोनी अचलपूर येथील प्रहार कार्यालय येथे मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला मंढपाळांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

जिल्ह्यामध्ये राज्यामध्ये महामेष योजने करता लाभार्थी संख्या खूप असताना उद्दिष्ट मात्र फार थोडे देण्यात आले ही बाब शासन दरबारी रेटण्याकरता जास्तीत जास्त लोकांनी जनजागृती करून ऑनलाइन पद्धतीने महामेष मध्ये अर्ज करणे जेणेकरून शासनाचे हे लक्षात येईल की महामेष योजनेमध्ये लाभार्थ्यांची संख्या जास्त असून योजनेचे उद्दिष्ट वाढवणे आवश्यक आहे त्याकरता लढा उभारण्याकरता ह्या जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आल होते.

राज्यात तथा बाहेर राज्यामध्ये आधुनिक पद्धतीने शेळी व मेंढी पालन कशाप्रकारे केल्या जाते याकरिता मेंढपाळ बांधवांचा एक अभ्यास दौरा आयोजित करण्यात आलेला आहे यामध्ये एक मेंढपाळ बांधवांचा एक गट तयार करून राज्यात व राज्या बाहेर एक अभ्यास दौरा करून तसा अहवाल सादर करण्यात येईल.अचलपूर येथे डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची भरपूर जागा उपलब्ध असताना येथे मेंढपाळ बांधवांसाठी आदर्श असा बंदिस्त शेळी व मेंढी फार्म उभा करण्यात यावा अशी मागणी करण्यात आलेली आहे या मागणीला आमदार बच्चू कडू यांनी समर्थन दर्शविलेले आहे लवकरच याबाबत पाठपुरावा करून आदर्श असा बंदिस्त शेळी व मेंढी फार्म उभारण्यात येईल.

मेंढपाळ बांधवांच्या मेळावा करता जवळपास ५०० लोकांचा उपस्थिती होती या उपस्थितीमध्ये. यामध्ये प्रामुख्याने डॉक्टर संजय कावरे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त तथा डॉक्टर पुरुषोत्तम सोळंके जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद अमरावती तथा तालुक्यातील सर्व पशु संवर्धन अधिकारी मार्गदर्शन करण्याकरता उपस्थित होते या मेळाव्यामध्ये एकाच छताखाली दहा वेगवेगळे योजने करता शेतकऱ्यांकडून फॉर्म भरण्यात आलेले आहे. तथा यानंतरही ही प्रक्रिया दिनांक २६ तारखेपर्यंत सुरळीत राहील असे आयोजकांकडून सांगण्यात आलेले आहे

बाहेर राज्यातील राजस्थानी मेंढ्या या चराई करता आपल्या अमरावती जिल्ह्यामध्ये येतात त्या येताना भरपूर प्रकारच्या रोगराई घेऊन येतात येताना ते कायमस्वरूपी स्थलांतरित मेंढपाळ कुठलीही लसीकरण जंत निर्मूलन करत नाही त्यामुळे स्थानिक जनावर हे रोगात बळी पडतात व आपल्या स्थानिक जनावरांचा चारा संपवून आपल्या स्थानिक जनावरांना उपासमारीला समोर जावे लागते, त्यामुळे आमदार बच्चू कडू यांनी पथदर्शी असा निर्णय घ्यावा अशी मागणी मेंढपाळ बांधवांनी मेळाव्यात बोलून दाखवली.

राष्ट्रीय पशुधन विकास योजनेअंतर्गत सर्वप्रथम चांदूरबाजार तालुक्यात ३५ प्रस्ताव सादर करण्यात आलेले होते त्यापैकी २१ प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले असून त्यातील २१ प्रकल्प हे मंजूर झालेले आहे. तथा आमदार बच्चू कडू हे अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांनी या योजनेमध्ये जास्तीत जास्त पुढाकार घेऊन राष्ट्रीय पशुधन विकास योजनेसाठी मदत करावी ही एक मुखाने ही मागणी उपस्थित मेनपाळ बांधवांकडून करण्यात आलेली आहे .स्वागताकरता उपस्थित धनगर बांधवांनी आमदार बच्चू कडू यांचे मानाचा दुपट्टा व काठी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आलेले आहे. या मेळाव्याच्या आयोजना करता प्रहार मेंढपाळ पुत्र आर्मी, विशेष प्रयत्न केलेले आहे.

# अचलपुरात फुलडोल उत्सवाचा जल्लोष साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अचलपूर**



शहरातील चावलमंडी भागातून श्री भक्त बिहारी संस्थान व रतनलाल चौधरी कुटुंबाच्या पुढाकाराने दरवर्षी आयोजित होणारा परंपरागत फुलडोल उत्सव शनिवारी परिवर्तन एकादशीच्या रात्री उत्साहात पार पडला. फुलडोल म्हणजे फुलांनी सजविलेले डोल, ज्यामध्ये राधाकृष्णाची मंदिरातील मूर्ती ठेवण्यात आली होती.

देवडी येथील लक्ष्मीनारायण मंदिर, सत्यनारायण मंदिर, मोठा राममंदिर, जुना सराफा व रतनलाल चौधरी कुटुंब (चावलमंडी) या चारही मंदिरांतून निघालेली फुलडोल दरवर्षी परिवर्तन एकादशीला म्हणजे फुलडोल एकादशीला एका ठिकाणी येऊन मिळतात. अचलपूर शहरातून फुलांनी सजविलेल्या डोलीतून कृष्ण व राधा जलविहाराला निघतात. ती डोली फुलांनी सजविली जाते म्हणून या उत्सवाला फुलडोल असे म्हणतात. देवडी भागातून जुना सराफा, चावलमंडी, जुना बस स्टॅन्ड, बडी संगत, जीवनपुरा गेट, माळवेशपुरामार्गे ही फुलडोल शहरात मार्गक्रमण करून जीवनपुरा येथील अमिनाथ संस्थानानजीक बिच्छन नदीच्या पाण्याने राधा-कृष्णाच्या मूर्तीला स्नान करण्यात आले. तेथेच आरती-भजनेझाली. या वेळी मोठी शोभायात्रा शहरातून लेझीम, बँड पथकासह काढण्यात आली. राधा-कृष्णाचा देखावा साकारण्यात आला होता. देशभक्ती, मनोरंजन, सांस्कृतिक तसेच कृष्णभक्तीचा संदेशसुद्धा या फुलडोल उत्सवात देण्यात आला.

उत्सवाकरिता श्री भक्तबिहारी संस्थानचे अनिल चौधरी, संजय चौधरी, शरद चौधरी, काळे गुरुजी, सत्यनारायण मंदिर व लक्ष्मीनारायण मंदिराचे मनोज झंवर, गोपाल झंवर, विनोद साकोण्या, मोठा मंदिराचे हेमंत सेंगर, राजू सेंगर, नंदू केवट, अमोल साबळे यांनी परिश्रम घेतले. अचलपूर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला.

**सर्वत्र एकच उत्साह**

अनेकांच्या खांद्यावरून फुलडोलचा प्रवास झाला. फुल डोलच्या खालून लहान मुलांना, महिलांना काढून कृष्णाचा आशीर्वाद मिळत असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे महिलावर्ग या उत्सवात उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. मार्गात ठिकठिकाणी राधा-कृष्णाची पूजा करण्यात आली. ठिकठिकाणी चहापान, प्रसाद, फराळ व्यवस्था करण्यात आली होती.

# समाजाचा दर्जा वाढविण्याकरता प्रत्येकाने राजकीय जागृती ठेवावी : मनोहर सुने

## अखिल भारतीय बारी समाज राजकीय विचार मंच सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ चांदूर बाजार**



समाजाचा दर्जा, किंमत वाढविण्याकरता प्रत्येकाने राजकीय जागृती ठेवून राजकारणात उतरलेच पाहिजे असे माजी जिल्हा परिषद सभापती मनोहराव सुने यांनी अखिल भारतीय बारी समाज राजकीय विचारमंच्या आयोजित बैठकीमध्ये बारी समाजाचे राजकीय अस्तित्व या विषयावर ते बोलत होते. राजकीय दृष्ट्या बारी समाजाचा इतर समाजाने राजकीय फायदा घेतल्यामुळे बारी समाज दुर्लक्षित राहिलेला आहे. दुर्लक्षित राहिलेला बारि समाज आता संघटित झाला असून समाजातील युवा वर्गांना दिशा देण्याकरीता या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सुने म्हणाले.राजकीय पक्षांनी बारी समाजाची दखल न घेतल्यास बारी समाज येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत आपले अस्तित्व निर्माण करणार असल्याचे ते म्हणाले. अमरावती येथील टौंगसे पाटील बिल्डकॉन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडच्या संचालित सभागृह मध्ये आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी टोंगसे पाटील बिल्डकॉन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष श्रीकृष्णराव टोंगसे, तर प्रमुख पाहुण्यांमध्ये डॉ अरविंद कुऱ्हाडे, मनोहर सुने, संजय बोडखे , प्रदीप खेडकर आदी मंचकावर उपस्थित होते. आपण संघटित नसल्यामुळे आपल्या बारी समाजाचे इतर जातीप्रमाणे कुठेही नाव काढण्यात येत नाही, त्यासाठी आपल्याला संघटित होणे आवश्यक असल्याचेही डॉ अरविंद कुऱ्हाडेम्हणाले.या वेळी सर्व समाज बांधवाने स्वतः च्या कार्याचा परिचय देऊन आपआपले मत समाजविषयी,आजचे राजकारणाच्या परिस्थिती विषयी व्यक्त केले.राजकीय दृष्ट्या यातून सर्व समाजबांधव एकत्र येऊन राजकारण असो की समाजकारण चांगले करू शकेल.कारण राजकारणात बारी समाजाची ओळख कमी आहे, फार कमी आमदार ,खासदार , नगरसेवक होऊन गेले आहे. ग्रामपंचायत मध्ये थोडं प्रमाणात अस्तित्व आहे. या सर्व दृष्टीने विचार करून ग्रामीण भागातील किंवा शहरी भागातील समाजबांधवा पर्यंत पोहचण्याचे उत्तम असे माध्यम हे बारी समाज राजकीय विचारमंच असल्याचे संजय बोडके म्हणाले.

या बैठकीमध्ये बारी समाज राजकीय स्थितीवर चर्चा करण्यात आली. बारी समाजाचे समाजातील स्थान उंचावण्याकरीता राजकीय धोरण ठरविन्या बाबत चर्चा करण्यात आली, बारी समाज मुला मुलींचे शैक्षणिक बाबत चर्चा करून धोरण ठरवण्याकरिता चर्चा करण्यात आली. बारी समाजाचे , सर्व स्तरावर स्थान उंचावण्याकरीता वेगवेगळे फोरम ( समिती) तयार करून त्यांचे गठन करून सल्लागार मंडळ स्थापन या बैठकीमध्ये करण्यात आले आहे. या सदर सभेमध्ये बारी समाजाचे राजकीय अस्तित्व समाजाचे प्रश्न याबाबत सखोल चर्चा होऊन समाजाचे राजकीय संघठन निर्माण करून सत्तासहभाग असल्याशिवाय समाजाचे प्रश्न सुटनार नाहीत असे मत सर्व बारी समाज बांधवांनी व भगिनींनी व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप सुने ,संचालन प्रमोद कुऱ्हाडे तर आभार प्रदर्शन विनोद हेंड यांनी केले आहे .या सभेला संपूर्ण महाराष्ट्रातून आपल्या बारी समाजातील गणमान्य मंडळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील बारा बलुतेदार समाजप्रमुखांच्या बैठका घेऊन त्यांच्या सोबत संपूर्ण महाराष्ट्रात बारी समाजाचे प्रभुत्व असलेल्या मतदारसंघात उमेदवार उभे करण्याचा मानस राजकीय मंचाने केलेला आहे.

# राष्ट्रीय इंटॅक हेरिटेज प्रश्न मंजूषा स्पर्धेचे अमरावती येथे प्रथमच आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**



भारतीय राष्ट्रीय कला व सांस्कृतिक वारसा संस्था, नवी दिल्ली अर्थात इन्टॅकच्या वतीने सांस्कृतिक वारसा जतन करणे, संवर्धन करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये त्याबाबतीत जनजागृती करण्यासाठी दरवर्षी वारसा प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. इंटॅकच्या वारसा शिक्षण व संवाद विभागातर्फे दरवर्षी इयत्ता ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले जाते.

अमरावती येथे मागील वर्षी इन्टॅक चॅप्टर सुरु झाल्यानंतर यावर्षी प्रथमच या उपक्रमाचे अमरावती मध्ये आयोजन करण्यात आले होते.या वारसा प्रश्नमंजूषा स्पर्धेच्या अमरावती जिल्हास्तरीय फेरीचे आयोजन शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या परिसरात इन्टॅक अमरावती चॅप्टर व शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या इतिहास आणि वनस्पतीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील एकूण सहा शाळांमधील ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.या प्रश्न मंजूषा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी इतिहास विभाग प्रमुख डॉ जी. एस. महाडिक व वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सतीश माळोदे, अमरावती इन्टॅक चॅप्टरचे संयोजक डॉ. जयंत वडतकर, प्रश्न मंजुषा तज्ञ श्री अनुप मंचलवार नागपूर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम अमरावती चॅप्टर चे संयोजक डॉ. जयंत वडतकर यांनी या उपक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्रश्न मंजुषा तज्ञ श्री अनुप मंचलवार नागपूर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेचे नियम व संचलन याबाबत संपूर्ण माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. मंजुषा वाठ यांनी केले.या स्पर्धेत भारतातील तसेच आपापल्या राज्यातील ऐतिहासिक वारसा आणि स्थानिक वारसा या स्तरावरील माहितीवर आधारित लेखी परीक्षेमधून प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांची एक चमू याप्रमाणे पाच चमू दुसर्या फेरीसाठी निवड करण्यात आली. दुसरी फेरी तोंडी प्रश्नोत्तरे, बझर राउंड प्रमाणे घेण्यात येऊन यामधून निवड झालेली पहिल्या क्रमांकाची चमू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे.वनस्पतीशास्त्र विभागाच्या सभागृहात पार पडलेल्या या प्रश्नमंजूषा स्पर्धेत जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पोदार इंटरनॅशनल स्कूलचे विद्यार्थी तस्मय शिंगणे व अथर्व गिरी, दुसरा क्रमांक नारायणा विद्यालयमचे विद्यार्थी अमेय कडू व मल्हार खडसे, तिसरा क्रमांक ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलचे सार्थक इंगळे व साहिल शेंदरे, चौथा क्रमांक पोदार इंटरनॅशनल स्कूलचे शुभम सारडा व सुजय बानाईत तर पाचवा क्रमांक पोदार इंटरनॅशनल स्कूलचे पवनी शैलेश कुमारी व अनुष्का मोहोड यांनी पटकावलेत. प्रथम क्रमांकावर निवड झालेली चमू राज्य स्तरावरील स्पर्धेत सहभागी होणार आहे. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इन्टॅक तर्फे स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व भेटवस्तू देण्यात आले.या स्पर्धेत सहभागी होणार्या सर्व विद्यार्थ्यांना इन्टॅक नवी दिल्ली तर्फे सहभाग प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

# समतेच्या न्यायहक्कासाठी दहीहंडी स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ तिवसा - १२**



राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी समर्पित असलेली दहीहंडी स्पर्धा अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथील देवराव दादा महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडली. ही दहीहंडी म्हणजे महिलांच्या सन्मानासाठी तसेच स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्याय हक्कासाठी लढणाऱ्या सर्वांचा आवाज असलेली दहीहंडी आहे. या दहीहंडी स्पर्धेतील स्पर्धकांनी केलेली उत्कृष्ट चढाई आणि रचलेले मानवी धर हे चित्त थरारक होते. यानिमित्ताने पुन्हा एकदा राज्यातील जुलमी सरकारला त्यांची जागा दाखवून देण्यासाठी महिलांनी विशेष सहभाग घेतलेली ही दहीहंडी स्पर्धा निश्चितच सरकारच्या पापाचा घडा फोडणारी आहे अशी प्रतिक्रिया काँग्रेसच्या नेत्या आणि आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथे ड.यशोमती ठाकूर मित्र मंडळ आणि तिवसा तालुका आणि शहर काँग्रेस कमिटी च्या वतीने या भव्य दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार बळवंतराव वानखडे, आमदार ड. यशोमती ठाकूर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सचिव कुणाल चौधरी आमदार धिरज लिंगाडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासह सिने क्षेत्रातील मान्यवर अभिनेते उपेंद्र लिमये, संस्कृती बालगुडे ,जुई गडकरी, भाविका तसेच विदर्भातील श्रुतिका गावंडे यांची विशेष उपस्थिती होती.या स्पर्धेत विदर्भातील अनेक दहीहंडी सहभाग नोंदवत आपले कौशल्य पणाला लावले. स्वातंत्र्य समता बंधुता आणि न्यायासाठी तसेच देशातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी आयोजलेल्या या दहीहंडी स्पर्धेत विजेत्या संघाला ५१ हजार रुपयांचे बक्षीस द्वितीय विजेत्या संघाला ३१ हजार रुपयांचे बक्षीस तर तृतीय विजेत्या संघाला २१ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले. दहा हजार रुपयांचे प्रोत्साहन पर बक्षीसही विशेष चढाई करणाऱ्या संघाला देण्यात आले. तर प्रत्येक सहभागी संघास स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या स्पर्धेत प्रथम बक्षिसशिव तांडव गोविंदा पथक शिरजगाव कसबा द्वितीय बक्षिस कालभैरव गोविंदा पथक शिरगाव कसबा तर तृतिय बक्षिस वीर भगसिंह गोविंदा पथक सर्फापूर या संघांनी पटकावले.दहीहंडीचा हा उत्सव आपल्यासाठी आपल्या माणसांसाठी आयोजित करण्यात आला असून याद्वारे राज्यातील महागाई आणि शेतमालाला न मिळणारे भाव शेतकऱ्यांची होणारी परवड या सगळ्या विरोधातील जनतेचा बुलंद आवाज होता, हा आवाज नक्कीच सरकारच्या कानाचे पडदे फाडणार आहे, असे यावेळी बोलताना आमदार ड.ठाकूर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूत्रसंचालिका भाविका पोटे तर आभार प्रदर्शन अमर वानखडे यांनी केले.

# राहुल गांधींची जीभ कापणाऱ्यास ११ लाखांचे बक्षीस; संजय गायकवाड यांची प्रक्षोभक घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६बुलढाणा**



काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणासंदर्भात केलेल्या वक्तव्यामुळे वाद उफाळून आला असून त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. अशातच, राहुल गांधी यांची जीभ छाटणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस देऊ, अशी प्रक्षोभक घोषणा शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी केली आहे. यामुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असून त्याचे पडसाद राजधानी दिल्लीसह संपूर्ण भारतात उमटण्याची चिन्हे आहे.

आज बुलढाणा येथे निवडक प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींसोबत बोलतांना आमदार संजय गायकवाड यांनी हे स्फोटक विधान केले. राहुल गांधी यांच्या कथित आरक्षणविरोधी विधानामुळे काँग्रेसचा खरा चेहरा समोर आला आहे. त्यांना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय यांचे आरक्षण संपवायचे आहे. राज्यात आणि भारत देशात आरक्षणावरून आग भडकवली असताना राहुल गांधी यांनी विदेशात जाऊन हे विधान करून आपली आरक्षणविरोधी भूमिका मांडली आहे.

याचा अर्थ त्यांना आरक्षण संपवायचे आहे. दलित, आदिवासी, ओबीसी यांना इतरांसमवेत, पुढारलेल्या जातींसोबत येण्याची, आर्थिक-शैक्षणिक प्रगती साधण्याची संधी मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमाने आरक्षण दिले आहे. मात्र राहुल गांधी यांनी विदेशी भूमीवर आरक्षण विरोधी। भूमिका मांडली आहे. या राहुल गांधीची जीभ छाटणाऱ्याला माझ्याकडून अकरा लाख रुपयांचे रोख बक्षीस देईल या स्फोटक विधानाचा आमदार संजय गायकवाड यांनी चर्चेदरम्यान पुनरुच्चार केला. लोकसभा निवडणुक प्रचारात याच नेत्याने आणि त्यांच्या। भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने , भारतीय जनता पार्टी केंद्रात पुन्हा सत्तेत आली तर संविधान बदलतील, आरक्षणाला धोका आहे, असा फेक नरेटिव्ह तयार केला होता. आता राहुल गांधी यांनी आरक्षण विरोधी भूमिका मांडली असून त्यांचा दलित आदिवासी बदलचा कळवळा वरवरचा असल्याचा आरोप आमदार गायकवाड यांनी यावेळी केला.

## अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे परदेशातील उच्च शिक्षणाचे स्वप्न भंगणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अल्पसंख्यांक परदेश शिष्यवृत्तीची यादी अजूनही जाहीर झालेली नाही. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतरची पुढील प्रक्रिया एक महिन्याची असते. काही विद्यापीठातील शैक्षणिक शुल्क भरण्याची तारीख सुद्धा निघून गेली आहे. अशा परिस्थितीत यादीच जाहीर न झाल्याने अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे परदेशातील उच्च शिक्षणाचे स्वप्न भंगणार असल्याचे दिसून येते.अल्पसंख्याक परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत ७५ विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी राज्य शासनाद्वारे देण्यात आली आहे. अल्पसंख्याक परदेश शिष्यवृत्ती २०२४-२५ साठी २१ ऑगस्ट २०२४ रोजी अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज जमा करण्याचा शेवटची तारीख ६ सप्टेंबर होती. जवळपास ६० विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज केले होते. अर्जदार विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांचे परदेशातील अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. तर काहींचे लवकरच सुरू होणार आहेत. विशेषतः यूकेतील विद्यापीठांसाठी १५ सप्टेंबर ही शैक्षणिक शुल्क भरण्याची अंतिम तारीख होती. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतरची पुढील प्रक्रिया जवळपास एक महिन्याची असते.

# मिठाई, जाम, जेली, कँडीसाठी वापरले जाणारे 'जिलेटीन' आता बॉयलर कोंबडीच्या वेस्टपासून बनणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६नागपूर**

मिठाई, जाम, जेली, कँडी यांमध्ये जाडसरपणा आणणे, सॉफ्ट आणि हार्ड कॅप्सुलचे कव्हर, फेस मास्क, सौंदर्य प्रसाधन निर्मिती, फोटो फिल्म, पेंट, डिंक निर्मिती, सर्जरी स्पंज, रक्तस्राव रोखणे, दूध किंवा दही घट्ट करणे, डेअरी उत्पादनात स्थिरता आणणे, मांस रोल्स, हॅम आणि सॉसेज, जैविक पॅकेजिंग, पेय उद्योगामध्ये जिलेटीनचा वापर होतो. या जिलेटिनच्या निर्मितीसाठी आता बॉयलर कोंबडी मधून वाया जाणारे जाणाऱ्या घटकाचा वापर केला जाणार आहे. चिकनसाठी ब्रॉयलर कोंबडी कापल्यानंतर तब्बल ३७ टक्के वाया जाणारे घटक (वेस्ट) मिळतात. यापासून जिलेटीन निर्मितीसाठी उदगीर येथील पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालयातील तज्ज्ञांना यश आले आहे. विशेष म्हणजे जिलेटीन मिळविण्यासाठी पहिल्यांदाच फूड ग्रेड घटकांचा वापर करण्यात आला आहे.

### जिलेटीनचा वापर कशासाठी?

खाद्य पदार्थ, औषधी तसेच सौंदर्य प्रसाधने आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये जनावरांची त्वचा, हाडांपासून तयार होणाऱ्या जिलेटीनचा वापर केला जातो. कोंबडी, वराह, जनावरे आणि माशांच्या टाकाऊ घटकांपासून जिलेटीन तयार करतात. चिकनसाठी कोंबडी कापल्यानंतर केल्यानंतर त्वचा, हाडे आणि पाय हे वाया जाणारे घटक मिळतात. यापासून जिलेटीन तयार करण्यासाठी फूडग्रेड घटकांचा वापर करण्यात 'माफसू'मधील तज्ज्ञांना यश आले आहे.

### कुठल्या जनावरांपासून किती जिलेटीन मिळते?

हैदराबाद येथील मांस संशोधन संस्थेचे सहकार्य यासाठी मिळाले आहे. या संशोधनामुळे कोंबडी कटिंग नंतर टाकाऊ घटकांना देखील बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. सध्या हैदराबाद परिसरात यावर आधारित एक उद्योग कार्यरत आहे. कोंबडी त्वचेपासून १० ते १५ टक्के, वराहाच्या त्वचेपासून ४६ टक्के, जनावरांच्या चामड्यापासून २९.४ टक्के, जनावरांच्या हाडांपासून २३.१ टक्के आणि माशांपासून १.५ टक्के जिलेटीन मिळते.

# फरार आरोपीला पकडायला गेलेल्या पोलिसाला मारहाण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नेरपिंगळाई**

एका गुन्ह्यातील फरार आरोपीला शोधायला गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्याला आरोपीसह अन्य चार जणांनी धक्काबुक्की केली. याच संधीचा फायदा घेऊन आरोपी पुन्हा फरार झाला. ही घटना शिरखेड पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या नेरपिंगळाई येथील पांडेपुरा परिसरात घडली. राहुल रमेश पांडे (३०) असे फरार झालेल्या युवकाचे नाव आहे. फरार युवकावर यापूर्वी शिरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.दरम्यान तो फरार असून त्याच शोध घेण्यासाठी शिरखेड पोलिस ठाण्याचे पोहेकॉ मनोज कळसकर हे त्याच्या घरी गेले होते. त्या वेळी तो घरीच होता. कळसकर यांनी त्याला ताब्यात घेतले होते. परंतु, त्याच वेळी राहुलसह प्रशांत रमेश पांडे (२६), देवेंद्र महादेव इंगळे (४०) व २६ वर्षीय महिला, अशा चौघांनी त्यांना धक्काबुक्की करत लोटालोटी केली. याचाच फायदा घेत युवक पुन्हा फरार झाला. या प्रकरणी कळसकर यांच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डेंगूबाधित रुग्णांवर जमिनीवर झोपून उपचार अमरावतीत आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

अमरावतीच्या मेळघाटातून आरोग्य व्यवस्थेचा गलथान कारभार समोर आला आहे. चिखलदरा तालुक्यातील जामली आर गावात डेंगू बाधित महिला रुग्णांवर जमिनीवर उपचार केले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या संपूर्ण प्रकाराकडे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचं दुर्लक्ष असल्याचे पाहायला मिळत आहे.

प्रधानमंत्री जलजीवन मिशन अंतर्गत गावात जी पाईपलाईन अंथरली तीच पाईपलाईन येथे विपरीत परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरल्याचा आरोप येथील ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित कंत्राटदाराकडून पाईपलाईनचे काम निकृष्ट दर्जाचं करण्यात आल्याने लिकेज झालेल्या पाईपलाईनमधून गावात दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे. त्यामुळे जमली आर गावात गेल्या २१ दिवसात ९ जण दगावल्याची गंभीर घटना समोर आली आहे. तर २३ जणांना अतिसाराची लागण झाल्याचं उघडकीस आलं. तिघांचा मृत्यू हा अतिसाराची लागण झाल्यामुळे झाल्याचं स्पष्ट झालं होतं.

आरोग्य विभागाकडून १५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. ज्या लिकेज झालेल्या पाईपलाईनमधून गावात अतिसाराची लागण पसरली ती पाईप लाईन बंद केल्याचं देखील आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. अतिसाराच्या रुग्णांची प्रकृती बरी होत नाही तोच जामली आर गावात ७ डेंग्यूचे रुग्ण आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली.

परिस्थितीचं गांभीर्य पाहता आरोग्य विभागाने जिल्हा परिषदेच्या शाळेत अस्थाई स्वरूपाचा दवाखाना उभारून थातुरमातुर उपाययोजना केल्याचं पाहायला मिळतं आहे. त्याच ठिकाणी डेंगू बाधित असलेल्या महिलांवर जमिनीवरच उपचार सुरू असल्याचं समोर आलं आहे. खासदार अनिल बोंडे, बळवंत वानखडे, आमदार राजकुमार पटेल आदींनी या ठिकाणी भेटी देऊन आरोग्यव्यवस्थेचा आढावा घेतला होता. मात्र जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अद्यापही या ठिकाणी भेट दिली नसल्याचं नागरिकांनी सांगितलं. लोकप्रतिनिधीनी भेट देऊन आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्याचे निर्देश दिले. रुग्णांसाठी खाटा उपलब्ध करून देण्याचेही सांगितले. मात्र तरीही रुग्णावर जमिनीवरच उपचार सुरू असल्याचे दिसून आले.

# वलगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

## डॉ. वेळेवर हजर होत नसल्यामुळे रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल : महिला डॉक्टर असल्यामुळे रुग्णांवर करतात खोटे गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**



अमरावती तालुक्यातील वलगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे वलगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर दक्षयानी अनवाने वेळेवर उपस्थित होत नसल्यामुळे व रुग्णांचा उपचार करत नसल्यामुळे रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे डॉक्टर दक्षयानी अनवाने यांची ड्युटीवर हजर असण्याची वेळ सकाळी आठ वाजता सुरू होते मात्र त्या ड्युटीवर दुपारी ऐक वाजता हजर होतात व आपल्या ऑफिसमध्ये दरवाजा बंद करून झोपल्या राहतात असा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे आज दिनांक १५ सप्टेंबर रविवार रोजी वलगाव येथील निवासी पेशंट अब्दुल जलील अब्दुल कदीर व इर्शाद शाहा कासम शाहा यांची दोघांचीही छाती दुखत असल्यामुळे व बीपी वाढल्यामुळे त्यांना वलगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते मात्र तिथे डॉक्टर उपस्थित नसल्यामुळे त्यांच्यावर वेळेवर उपचार होऊ शकला नाही त्यांच्या जिवाला जर काही कमी जास्त झाले असते तर याला जबाबदार कोण असा प्रश्न त्यांच्या कुटुंबाने व गावातील नागरिकांनी उपस्थित केला आहे डॉक्टर दक्षयानी अनवाने ह्या २०२१ मध्ये वलगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुजू झाल्या होत्या गेल्या सहा महिन्यांपासून त्यांच्याकडे वलगाव प्राथमिक आरोग्य केंद्राची प्रभारी वैद्यकीय अधिकारी याची जबाबदारी आहे मात्र त्या आपल्या जबाबदारीला सातत्याने काळीमा फासत आहे वलगाव ग्रामपंचायचे सरपंच सुधीर उगले हे ऐकदा अपघाताचा पेशंट घेऊन दवाखान्यात गेले होते मात्र तेव्हाही डॉक्टर दक्षयानी अनवाने उपस्थित नव्हत्या नंतर डॉक्टर दक्षयानी अनवाने आणि डॉक्टरांचे वडील जेव्हा दवाखान्यात आले तेव्हा वलगावचे सरपंच सुधीर उगले यांनी डॉक्टर दक्षयानी अनवाने यांना प्रश्न विचारला असता डॉक्टरांच्या वडिलांनी वलगाव चे सरपंच सुधीर उगले यांना शिवीगाळ केली होती व वलगाव पोलिसांना बोलवून पोलिसांना खोटं सांगून की वलगाव चे सरपंच रात्रीचे येतात व माझ्या मुलीला त्रास देतात त्यावेळी मोठा राडा सुद्धा दवाखान्यात झाला होता डॉक्टर दक्षयानी अनवाने यांचे वडील सातत्याने दवाखान्यातील कर्मचाऱ्यांना दमदाटी करतात व धमकीची भाषा वापरतात दवाखान्यातील कर्मचाऱ्यांनी सुद्धा डॉक्टर दक्षयानी अनवाने यांच्या त्रासाला कंटाळून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांना लेखी निवेदन सुद्धा दिले आहे डॉक्टर दक्षयानी अनवाने यांनी अमरावतीचे पोलीस नवीनचंद्र रेड्डी यांच्या कडे खोटी तक्रार दाखल करून वलगाव येथील रुग्ण सेवकांना अडकवण्याचा प्रयत्न केला आहे या प्रकरणात वलगाव पोलिसांनी दोन रुग्णसेवकांवर गुन्हा सुद्धा दाखल केला आहे महिला डॉक्टर असल्यामुळे त्या आपल्या पदाचा गैरफायदा घेत आहे.असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. वलगाव गावात डॉक्टर दक्षयानी अनवाने बोगस असल्याच्या चर्चा सुद्धा रंगल्या आहेत हे सर्व गंभीर बाब असून याकडे आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा लक्ष देतील का? हे पाहणे महत्त्वाचं ठरणार आहे.दरम्यान आमच्या प्रतिनिधीने डॉक्टर दक्षयानी अनवाने यांची आज प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी नकार दिला.

# मेडिकल कॉलेज सुरु करण्यासंबंधाने ४०० कोटी रु टेंडर ची प्रोसेस सुरु



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

बडनेरा मतदार संघातील अलियाबाद कोंडेश्वर रोडवर शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाची इमारत बिल्डींग अंदाजे १४०० कोटी रु. खर्च करून उभी राहणार आहे. त्यासाठी प्राथमिक कामे, अत्यावश्यक कामे बांधकामासाठी ४०० कोटी रुपयाची निविदा निघाली आहे. आ. रवि राणा यांनी राज्यसरकार कडे व केंद्रसरकार कडे सतत या बाबत पाठपुरावा केला आहे.त्यांच्या या प्रयत्नाला यश आले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी वेळोवेळी आ.रवि राणा यांना सहकार्य केले आहे. त्याबाबत आ. रवि राणा यांनी त्यांचे आभार मानले.वरील कामांसाठी टप्पाटप्प्याने पैसे मिळणार आहे. हि सर्व कामे केंन्द्र सरकार अधिकृत कंत्राटदार RITES LTD या कंपनीकडे हे कामे देण्यात आली आहे. त्यांचे मार्फत हि दर्जेदार कामे होणार असुन आ. रवि राणा यांचा या कंपनीकडे पाठपुरावा सुरु आहे. तसेच मेडिकल कॉलेजच्या बांधकामाच्या संबंधी गुणवत्ता दर्जेदार राहावी यासंबंधाने आ.रवी राणा लक्ष देणार आहे.

# ईद-उल-मिलादुन्नबीचा पर्व विकासातून समृद्धीकडे नेणारा उत्सव : आ.सौ.सुलभाताई खोडके

## शाही जुलूसचे स्वागत...मुस्लिम बांधवाना पुष्प भेट देऊन दिली मुबारकबाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

ईद-उल-मिलादुन्नबीचा पर्व हा हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्माचा पर्व असून समाजाला अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा पर्व आहे. शांती,सभ्यता, नीतिमत्ता व मानवतेची शिकवण देणारा हा एक लोकोत्सव आहे. जीवनात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे झालेल्या चुकांची क्षमाचायाचना करून सदाचाराचा मार्ग अवलंबित सर्वानी विकासाच्या ध्येयाने प्रेरीत होऊन समृद्धीकडे वाटचाल करण्याचे आवाहन करीत आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सर्वांना ईद-उल-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या.

सालाबादाप्रमाणे ईद-उल-मिलादुन्नबीचा पर्व सोमवार दिनांक १६सप्टेंबर २०२४ रोजी सर्वत्र साजरा करण्यात आला. अमरावती शहराच्या मुस्लिम बहुल भागातही जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीचा उत्साह दिसून आला. याप्रसंगी आ.सौ. सुलभाताई खोडके व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके यांनी जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीच्या कार्यक्रमात सहभागी होऊन अनुयायांसमवेत समरस होऊन ईद-ए-मिलाद चा आनंद द्विगुणित केला. यानिमित्याने शहरातून शाही जुलूस काढण्यात आला. यामध्ये सर्व अनुयायी मोठ्या श्रद्धेने व पारंपरिक पद्धतीने सहभागी झाले असता समाजाच्या एकतेचे दर्शन घडून आले. दरम्यान आमदार महोदयांनी भव्य शाही जुलूसचे स्वागत करीत पुष्पदेऊन



अनुयायांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या चांदणी चौक स्थित जनसंपर्क कार्यालय समोर जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीच्या कार्यक्रमात अनुयायांना शुभेच्छा देण्यात आल्या.

पैगंबर हजरत मोहम्मद यांनी नेहमी शांततेचा संदेश देऊन मानवतेचा पुरस्कार केला. त्यांचे विचार व संदेश हे समाजाला जीवनाचा सन्मार्ग दाखविणारे असून अनुयायांनी त्यांच्या विचारांचे पाईक होण्याचे आवाहन सुद्धा आमदार महोदयांच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी मुस्लिम धर्मगुरू यांचे सुद्धा आमदार महोदयांनी आशीर्वचन घेऊन विश्वकल्याणाची मनोकामना केली. दरम्यान अनुयायांचे जथ्थे च्या जथ्थे उसळले असता समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक सभ्यतेचे दर्शन घडून आले. याप्रसंगी मुस्लिम धर्मगुरू व मौलवी यांचे सुद्धा स्वागत करण्यात आले असता त्यांनी शुभेच्छांचा स्वीकार करत आमदार सौ. सुलभाताई खोडके यांना आशीर्वचन प्रदान केले. तसेच युवक बांधवापासून तर अबाल वृद्धांना शुभेच्छा देऊन आमदार महोदयांनी त्यांचा आनंद द्विगुणित केला . ईद-ए-मिलाद च्या निमित्ताने खुदाची प्रार्थना व इबादत करण्यात करण्याला घेऊन घेऊन अनुयायांमध्ये एकच उत्सुकता दिसून आली. यावेळी जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने जुलूस मधील अनुयायांसाठी शीतपाणी व शरबतची व्यवस्था करण्यात आली होती. जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीच्या कार्यक्रमात बहुसंख्य नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.